रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २६८
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, १७ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

कोकण रेल्वेमार्गाच्या संपूर्ण दुपदरीकरणासाठी हालचाली/२

रायगडातही डिजिटल जनगणनेची तयारी/५

राज्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगड उपविजेता/८

## दिल्ली एअरपोर्टवर दोन विमानांचा अपघात; प्रवासी सुखरूप

**नवी दिल्ली :** देशातील सर्वांत गजबजलेल्या दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर गुरुवारी



(दि.१६) एक मोठी दुर्घटना घडता-घडता टळली. स्पाइसजेट आणि अकासा एअरचे विमान धावपट्टीवर एकमेकांना घासल्याने मोठा गोंधळ उडाला. या अपघातात दोन्ही विमानांचे नुकसान झाले असून सुदैवाने सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षित आहेत. स्पाइसजेटचे विमान उड्डाणाच्या तयारीत असताना टॅक्सीइंग करत होते. त्याचवेळी तिथे स्थिर उभ्या असलेल्या अकासा एअरच्या विमानाला स्पाइसजेटच्या विमानाचा धक्का लागला. ही टक्कर इतकी जोरात होती की स्पाइसजेटच्या उजव्या बाजूचा पंखाचा भाग चक्काचूर झाला, तर अकासा एअरच्या विमानाचा शेपटाकडील भाग निकामी झाला आहे. विमानतळ प्राधिकरणाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत ही चूक पायलटची होती की ग्राऊंड स्टाफची याचा तपास सुरू केला आहे.

# लोकसभेत महिला आरक्षण विधेयक सादर

## लोकशाहीच्या बळकटीसाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल -पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्र सरकारने गुरुवारी (दि.१६) लोकसभेत महिला आरक्षण विधेयक अर्थात नारीशक्ती वंदन अधिनियम विधेयक सादर केले. हे विधेयक विशेष अधिवेशनातील एक महत्त्वपूर्ण कायदेशीर पाऊल आहे. यावेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला आरक्षणासाठी विरोधी पक्षांनी सोबत येण्याचे आवाहन केले तसेच सीमांकन प्रक्रियेत कुठलाही भेदभाव करणार नाही, असे आश्वासन दिले.

महिलांना ३३ टक्के राजकीय आरक्षण देण्यासंदर्भातील विधेयकावर या अधिवेशनाच चर्चा होऊन ते संमत करण्यासाठी सरकारकडून प्रयत्न केले जाणार आहेत. तीन दिवसांच्या अधिवेशनात या विधेयकावरील चर्चेसाठी १८ तासांचा अवधी देण्यात आला आहे. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, हे विधेयक



२५-३० वर्षांपूर्वीच लागू करायला हवे होते, पण आता ऐतिहासिक संधी आपल्या सर्वांना मिळाली आहे. देशाच्या धोरण निश्चिती प्रक्रियेत ५० टक्के लोकसंख्या असलेल्या महिलांचा वाटा असणे ही काळाची गरज आहे. ज्यांनी ज्यांनी या अधिकाराला विरोध केला, त्यांना देशातील महिलांनी कधीच माफ केले नाही. हे विधेयक कोणत्याही एका पक्षाच्या फायद्यासाठी नाही, तर देशाच्या लोकशाहीच्या बळकटीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

महिला आरक्षण विधेयकाला राजकीय तराजूत मापू नका. अर्ध्या लोकसंख्येला आपण रोखू शकत नाही. मला याचे राजकीय श्रेय घ्यायचे नाही. त्यामुळे सर्वांनी मिळून हे विधेयक पारित करावे. तुम्हाला हवे तर क्रेडिट तुम्हीच घ्या आणि हे विधेयक मंजूर करा, असे पंतप्रधान मोदींनी लोकसभेत नमूद केले.

पंतप्रधान मोदींनी पुढे म्हटले, कुठल्याही भ्रमात राहू नका की आपण देशातील नारीशक्तीला काही तरी देतोय. हा त्यांचा अधिकार असून आपण इतकी दशके त्यांना रोखले. जर आता तुम्ही याला विरोध केला, तर आम्हाला त्याचा फायदा नक्कीच होईल, असा टोलाही पंतप्रधानांनी विरोधकांना लगावला.

### महिलांना ३३ टक्के प्रतिनिधित्व मिळणार

घटनादुरुस्ती विधेयकानुसार शेवटच्या प्रकाशित जनगणनेच्या आधारावर करण्यात येणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर २०२९च्या संसदीय निवडणुकांपूर्वी महिला आरक्षण कायदा कार्यान्वित करण्यासाठी लोकसभेच्या जागा सध्याच्या ५४३वरून कमाल ८५०पर्यंत वाढवल्या जाणार आहेत. महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यासाठी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या विधानसभांमधील जागाही वाढवण्यात येतील. लोकसभा आणि विधानसभेतील महिलांसाठी राखीव जागा राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशातील वेगवेगळ्या मतदारसंघांना आळीपाळीने वाटप केल्या जातील, असे लोकसभा सदस्यांमध्ये वितरित केलेल्या विधेयकात म्हटले आहे.

(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)




## पनवेलमध्ये नारीशक्ती वंदन अधिनियम समर्थनार्थ भव्य पदयात्रा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय लोकशाहीतील ऐतिहासिक आणि परिवर्तनकारी टप्पा मानल्या जाणाऱ्या नारीशक्ती वंदन अधिनियम या कायद्याबाबत जनजागृती करण्यासाठी व जनसमर्थन मिळविण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने गुरुवारी (दि.१६) पनवेल शहरात भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम यांच्या नेतृत्वाखाली ही पदयात्रा मोठ्या उत्साहात पार पडली.

या पदयात्रेत पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपमहापौर प्रमिला पाटील, **(पान २ वर..)**

# सीबीएसई दहावीच्या परीक्षेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा शंभर टक्के निकाल



**खारघर : रामप्रहर वृत्त**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) घोषित केलेल्या इयत्ता दहावीच्या निकालात जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने नेत्रदीपक यश संपादन करत आपला दबदबा कायम राखला आहे. यंदाही शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून परीक्षेस बसलेले सर्व ३१० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या शाळेची विद्यार्थिनी अनन्या प्रवीणकुमार भुतडा हिने ९९.२० टक्के गुण मिळवून संपूर्ण नवी मुंबईत प्रथम क्रमांक पटकावण्याचा मान मिळवला आहे.

### ५४ विद्यार्थ्यांना ९५%पेक्षा अधिक गुण

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे चेअरमन तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अव्वल अनन्या भुतडा हिच्यासह सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे अनन्याला २५ हजार, द्वितीय मित्तल सुजाभाई पटेल (९८.६० टक्के), तृतीय देवांश विशाल जाधव (९८.४० टक्के), चतुर्थ आणि पाचवा क्रमांक पटकावणारे विद्यार्थी अनुक्रमे अर्णव भारत पाटील आणि विराज संजय अरगडे (दोघांनाही ९८ टक्के) यांना प्रत्येकी १० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे.

अनन्याने मराठी आणि डेटा सायन्स या विषयांमध्ये १००पैकी १०० गुण मिळवून आपल्या यशात मानाचा तुरा रोवला आहे. केवळ वैयक्तिक यशच नव्हे तर शाळेच्या एकंदर कामगिरीचा आलेखही उंचावलेला दिसतो.

एकूण विद्यार्थ्यांपैकी ५४ विद्यार्थ्यांनी ९५ टक्क्यांपेक्षा अधिक, १३७ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक, तर २८६ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. विषयनिहाय कामगिरीतही शाळेने बाजी मारली आहे. **(पान २ वर..)**

## राज्य विधान परिषदेच्या नऊ जागांसाठी निवडणूक जाहीर

### १२ मे रोजी मतदान

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या नऊ रिक्त जागांसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने कार्यक्रम जाहीर केला असून येत्या १२ मे रोजी यासाठी मतदान होणार आहे. विधानसभेतील सध्याचे पक्षीय बलाबल पाहता या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीचे वर्चस्व राहणार असल्याचे चित्र दिसत आहे.

निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये भाजपचे रणजितसिंह मोहिते-पाटील, संजय केनेकर, संदीप जोशी आणि दादाराव केचे यांचा समावेश आहे. याशिवाय नीलम गोऱ्हे (शिवसेना), अमोल मिटकरी (राष्ट्रवादी), शशिकांत शिंदे (राष्ट्रवादी शरद पवार गट), राजेश राठोड (काँग्रेस) आणि उद्धव ठाकरे (उबाठा) यांचीही मुदत संपत आहे. काँग्रेस नेत्या प्रज्ञा सातव यांच्या भाजप प्रवेशानंतर रिक्त असलेल्या परिषदेच्या जागेची पोटनिवडणूकसुद्धा १२ मे रोजी पार पडणार आहे.

विधानसभेत महायुतीचे (भाजप १३२, शिवसेना ५७ आणि अजित पवार गट ४१) असे प्रचंड संख्याबळ आहे. नऊपैकी सात जागांवर महायुतीचा विजय सुकर मानला जात आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीकडे सध्या एकूण ४६ (उबाठा २०, काँग्रेस १६ आणि शरद पवार गट १०) आमदार आहेत. एका जागेसाठी लागणारा कोटा पाहता मविआचा एक उमेदवार सहज निवडून येऊ शकतो, मात्र दुसऱ्या जागेसाठी त्यांना किमान १० मतांची जुळवाजुळव करावी लागणार आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त ७५ अभंगांचे उद्या लोकार्पण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि नादब्रह्म साधना मंडळाच्या वतीने निर्मिती करण्यात आलेल्या प्रचलित रागांवर आधारित ७५ अभंगांचे लोकार्पण शनिवारी (दि. १८) सायंकाळी ५ वाजता पनवेल येथे होणार आहे.

मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणाऱ्या या लोकार्पण सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, पनवेलचे महापौर नितीन पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, मंडळाचे सचिव व नगरसेवक परेश ठाकूर, पं. निवृत्तीबुवा चौधरी, नादब्रह्म साधना मंडळाचे अध्यक्ष वसंत पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

या अभंगांची रचना व सादरीकरण विविध अनवट आणि पारंपरिक रागांवर आधारित चालींमध्ये करण्यात आली आहे. त्यामुळे नवोदित विद्यार्थी, शिष्यवर्ग आणि संगीत अभ्यासकांना रागांची शास्त्रशुद्ध व सुसूत्र ओळख होण्यास मोठी मदत होणार आहे. भारतीय शास्त्रीय संगीताच्या परंपरेतील रागसंवर्धन आणि सातत्यपूर्ण जतन हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असून यामुळे अमृत महोत्सव वर्षाला आणखी एक सांस्कृतिक व आध्यात्मिक अधोरेखा लाभणार आहे.



## श्रीवर्धनमध्ये बिबट्याचा मुक्त संचार

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन तालुक्यातील जावेळे येथील मुख्य रस्त्यावर एक मोठा बिबट्या दिसल्याने खळबळ उडाली. या घटनेमुळे परिसरात घबराट निर्माण झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार जावेळे गावचे रहिवासी रोहित रांगळे बाईकवरून जात असताना त्यांना रस्त्यावर बिबट्या दिसला. त्यांनी धैर्याने या बिबट्याचे दृश्य आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात कैद केले. काही वेळ रस्त्यावर थांबून बिबट्या नंतर जवळच असलेल्या झाडीत निघून गेला. दरम्यान, प्रशासनाने सुरक्षिततेच्या दृष्टीने पावले उचलावीत, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

## उन्हाचा तडाखा! कुलर, पंखे, ग्रीन नेटला मागणी वाढली

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात वाढत्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले असून उष्णतेपासून बचावासाठी लागणाऱ्या साहित्याच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. परिणामी कुलर, पंखे, ग्रीन नेट या साधनांच्या किमतीत वाढ झाली आहे.

सध्या उन्हाचा पारा चढत असून दुपारच्या वेळेत रस्त्यांवर उष्णतेचा तडाखा जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिक शीतपेय तसेच घरगुती थंडावा देणाऱ्या उपकरणांकडे वळले आहेत.

'गरीबांचा एसी' म्हणून ओळखल्या



जाणाऱ्या कुलरच्या किमतीत यंदा सुमारे ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. छोटे कुलर १,५०० ते १,९०० रुपयांपर्यंत मिळत असून मोठे कुलर ४५०० ते ५००० रुपयांपर्यंत विकले जात आहेत. कुलरमध्ये वापरल्या जाणाऱ्या तांब्याच्या मोटारीचे दर वाढल्यामुळे ही दरवाढ झाल्याचे व्यावसायिक सांगत आहेत.

उष्णतेपासून बचावासाठी पंख्यांची मागणी वाढल्याने त्यांच्या किमतीतही वाढ झाली आहे. साधे टेबल फॅन, सीलिंग फॅन तसेच हायस्पीड फॅन यांच्या दरात १० ते २० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे.

उन्हाचा तडाखा कमी करण्यासाठी घरांच्या गच्ची, शेड, दुकाने व शेतांमध्ये ग्रीन नेटचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. ग्रीन नेटमुळे तापमान तीन ते चार अंशांनी कमी होते. त्यामुळे त्याची मागणी वाढली असून दरातही सुमारे १० टक्क्यांनी वाढ झाली आहे.



# कोकण रेल्वेच्या संपूर्ण दुपदरीकरणासाठी हालचाली

**मुंबई : प्रतिनिधी**





कोकण रेल्वेतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना प्रवास जलद होण्याची आशा निर्माण झाली आहे. संपूर्ण कोकण रेल्वेचा मार्ग दुपदरी करण्यासाठी केंद्र सरकारने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडने मार्ग क्षमतेत वाढ करण्याच्या उद्देशाने सुमारे २६३ कि.मी. मार्गाच्या दुहेरीकरणासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

खासदार रवींद्र वायकर यांनी १० फेब्रुवारी रोजी लोकसभेत कोकण रेल्वे मार्गाच्या दुपदरीकरणाचा मुद्दा उपस्थित केला होता. यावर रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंह यांनी हे उत्तर दिले आहे.कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (केआरसीएल) ची स्थापना रोहा ते कर्नाटक राज्यातील ठोकूरपर्यंत सुमारे ७४० किलोमीटर लांबीच्या रेल्वे मार्गाच्या बांधकामासाठी जुलै १९९० मध्ये करण्यात आली. सध्या कोकण रेल्वे कॉर्पोरेशनमध्ये रेल्वे मंत्रालयामार्फत भारत सरकारची ६६.३५% भागीदारी आहे,

तर महाराष्ट्र सरकारची १५.११%, कर्नाटक सरकारची १०.३०%, गोवा सरकारची ४.१२% आणि केरळ सरकारची ४.१२% भागीदारी आहे. कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडचे भारतीय रेल्वेत विलीनीकरण हे वरील सर्व भागधारक राज्य सरकारांच्या संमतीवर अवलंबून असल्याचे राज्य मंत्री यांनी पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे. त्यामुळे दुपदरीकण मार्गी लागण्यासाठी भागिदारीप्रमाणे प्रत्येक राज्याचा शेअर असणे आवश्यक आहे,


मात्र, त्या दृष्टीने प्रकल्प अहवाल तयार करण्यास प्रारंभ केल्याचे स्पष्ट होत आहे. कोकण रेल्वेच्या कार्यक्षेत्रातील ७४० मार्ग किलोमीटरपैकी रोहा–बीर आणि मडगाव माजोर्डा या विभागांदरम्यान सुमारे ५५ किलोमीटरचे दुहेरीकरणाचे काम आधीच पूर्ण झाले आहे. उर्वरित ६८५ मार्ग किलोमीटरची वहन क्षमता वाढवण्यासाठी दुहेरीकरण आवश्यक आहे,

ज्यासाठी पुरेशा आर्थिक गुंतवणुकीची गरज असून, यासंदर्भात रेल्वे मंत्रालयाने संबंधित राज्य सरकारांना त्यांच्या भागभांडवलाच्या प्रमाणात कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या भांडवली खर्चात योगदान देण्याची विनंती करण्यात आल्याचे सांगितले .

# रायगडातील २८ धरणक्षेत्रात उरला ३८.२३ टक्के जलसाठा

## २८पैकी २० धरणात ५० टक्क्यांपेक्षा कमी पाणी

**रोहा : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यातील २८ धरण क्षेत्रात ३८.२३ टक्के पाणीसाठा उपलब्ध असून सूर्यनारायण आग ओकत असल्याने पाणीसाठा घटण्याचा वेग वाढला आहे. अजूनही पाऊस सुरू होण्यासाठी दोन महिने शिल्लक आहे.त्यामुळे पाणी जपून वापरण्याची आवश्यकता आहे.

सूर्यनारायण आग ओकत असल्याने पाणीसाठा वेगाने घटत आहे.त्याचा परिणाम धरणातील पाणी साठ्यावर झाला आहे रायगड जिल्ह्यातील२८ धरणांपैकी २० धरणात ५० टक्या पेक्षा कमी पाणीसाठा उपलब्ध आहे. जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील ढोकशेत धरणक्षेत्रात पाणी साठ्याने तळ गाठला असून या धरण क्षेत्रात ० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. जिल्ह्यातील २ धरणात १० टक्के पेक्षा कमी पाणीसाठा उपलब्ध आहे.

रायगड जिल्ह्यातील २८ धरण क्षेत्रातील पाणीसाठा पाहता यामध्ये मुरुड तालुक्यातील फणसाड धरणक्षेत्रात ३५ टक्के पाणीसाठा उपलब्ध,तळा तालुक्यातील वावा धरणक्षेत्रात ७३ टक्के पाणीसाठा उपलब्ध,रोहा तालुक्यातील सुतारवाडी धरणक्षेत्रात ६३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, पेण तालुक्यातील आंबेघर धरणक्षेत्रात ६५ टक्के पाणीसाठा उपलब्ध, अलिबाग तालुक्यातील श्रीगांव धरणक्षेत्रात ३३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, सुधागड तालुक्यातील धरणक्षेत्रात कोंडगाव धरणक्षेत्रात २१ टक्के पाणीसाठा उपलब्ध, घोटवडे धरणक्षेत्रात ६ टक्के पाणीसाठा उपलब्ध, ढोकशेत धरणक्षेत्रात ० टक्के पाणीसाठा उपलब्ध,कवेळे धरणक्षेत्रात १७ टक्के पाणीसाठा उपलब्ध, उन्हेरे धरणक्षेत्रात ५ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे

श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरणक्षेत्रात ४६ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कुडकी धरणक्षेत्रात ४६ टक्के पाणीसाठा उपलब्ध,रानीवली धरणक्षेत्रात १८ टक्के पाणीसाठा उपलब्ध, म्हसळा तालुक्यातील पाभरे धरणक्षेत्रात ३६ टक्के पाणीसाठा उपलब्ध, संदेरी धरणक्षेत्रात ६३ टक्के पाणीसाठा, महाड तालुक्यातील वरंध धरणक्षेत्रात ४४ टक्के पाणीसाठा उपलब्ध, खिंडवाडी धरणक्षेत्रात ४७ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कोथुर्डे धरणक्षेत्रात ३४ टक्के पाणीसाठा उपलब्ध, खैरे धरणक्षेत्रात ४३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कर्जत तालुक्यातील साळोख धरणक्षेत्रात ३१ टक्के पाणीसाठा उपलब्ध, अवसरे धरणक्षेत्रात ३० टक्के पाणीसाठा उपलब्ध, खालापुर तालुक्यातील भिलवले धरणक्षेत्रात ५१ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कलोते मोकाशी धरणक्षेत्रात ४७ टक्के पाणीसाठा उपलब्ध, डोणवत धरणक्षेत्रात ३५ टक्के पाणीसाठा उपलब्ध, पनवेल तालुक्यातील मोरबे धरणक्षेत्रात ६१ टक्के, बामणोली धरणक्षेत्रात ५१ टक्के पाणीसाठा उपलब्ध, उसरण धरणक्षेत्रात ५१ टक्के पाणीसाठा उपलब्ध, उरण तालुक्यातील पुनाडे धरणक्षेत्रात २१ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

# राज्यात वन विभागाने २५० बिबटे पकडले

## बिबट व व्याघ्र सफारीचे नियोजन ▌वनमंत्री गणेश नाईक यांची माहिती

**नवी मुंबई : बातमीदार**



महाराष्ट्रात बिबट्यांच्या वाढत्या संख्येवर आणि वन्य प्राणी हल्ल्यांवर भाष्य करताना वनमंत्री नामदार गणेश नाईक यांनी आतापर्यंत २५० बिबटे वनविभागाने पकडले असून त्यांना सुरक्षित अधिवासात ठेवल्याची माहिती दिली. वनमंत्री गणेश नाईक हानी गुरुवारी ठाण्यात झालेल्या जनता दरबारात दिली.

गडकरी नाट्यगृहात पार पडलेल्या जनता दरबारात विविध विषयांवरील सुमारे २१९ निवेदने नागरिकांनी सादर केली. त्यापैकी ९०% निवेदनांवर कार्यवाही करण्यात आली. माजी खा. डॉ. संजीव नाईक, आमदार निरंजन डावखरे, भाजपा ठाणे शहराध्यक्ष संदीप लेले, माजी अध्यक्ष संजय वाघुले, उपमहापौर कृष्णा पाटील, ठाणे पालिकेचे अतिरिक्त आयुक्त उमेश बिरारी यांच्यासह विविध शासकीय आणि निमशासकीय खात्याचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्रात बिबट्यांची वाढती संख्या आणि वन्य प्राण्यांचे हल्ले याविषयी प्रसिद्धी माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नांवर उत्तरे देताना वनमंत्री नाईक यांनी सात–आठ वर्षांपूर्वी बिबट्यांची जी संख्या होती ती चौपटीने वाढल्याचे सांगितले. जुन्नर, आंबेगाव, शिरूर नाशिकमध्ये बिबट्यांची संख्या वाढली आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये बिबट सफारी आणि विदर्भामध्ये व्याघ्र सफारी सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यांचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे.

वाघांची शिकार आणि माकडांवर होणारे हल्ले याबाबत बोलताना वनविभागाने सतर्क राहून या प्रकरणातील आरोपींना गजाआड केले आहे. त्यांच्यावर खटले सुरू आहेत. काही आरोपींचे कनेक्शन देशात आणि परदेशातही असल्याचे आढळून आले आहे. रिक्षाचालकांना १ मे पासून मराठी भाषा अनिवार्य करण्यात आलेली आहे. याविषयी विचारले असता प्रत्येक व्यावसायिकाला व्यवहारिक मराठी आलीच पाहिजे असे मत मांडले. त्याचबरोबर आवश्यक व्यावहारिक मराठी शिकण्यासाठी त्यांना मुदतही दिली पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

# पोलादपूर शहरात आज सकल हिंदू संमेलन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

हिंदू सारा एक मंत्र हा दाही दिशांना घुमवू या, धरती–नभ–पाताळ ही भारू, प्राण पणाला लावू या" या घोषवाक्याने एकात्मतेचा संदेश देत पोलादपूर विभागात 'सकल हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवार, दि. १७ एप्रिल रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत प्रभात नगर येथील मंगलमूर्ती पार्क येथे हे संमेलन रंगणार असून, यामध्ये समाजातील मतभेद व मनभेद दूर करून एकजूट मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला जाणार आहे.

संमेलनात आकर्षक सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार असून, मान्यवर वक्ते समाजजागृती, एकात्मता आणि संघटन या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. समाजातील विविध घटकांना एकत्र आणून सामाजिक प्रश्नांवर सामूहिक तोडगा काढण्याचा संदेश या माध्यमातून दिला जाणार आहे.

या संमेलनास सर्व नागरिकांनी सहकुटुंब, सहपरिवार पारंपारिक वेशात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक 'सकल हिंदू समाज, पोलादपूर' तर्फे करण्यात आले आहे.या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेत प्रभू श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज, भगवान गौतम बुद्‌ध आणि भारतमातेच्या प्रतिमांचा संदर्भ हिंदू एकात्मतेच्या संमेलनासाठी करण्यात आला आहे.

# रेवा ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय रंगोत्सव स्पर्धेत यश

**रोहे : प्रतिनिधी**

रोह्यातील अंजुमन–ए–इस्लाम जंजिरा उर्दू हायस्कुल केंद्रात ११ जानेवारी २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय रंगोत्सव स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या स्पर्धेत रोहा एज्यूकेशनल अँड वेल्फअर असोसिएशन ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्सच्या १९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत १९ पैकी १९ अर्थातच १०० टक्के विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत नाव लौकिक मिळविले आहे.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळवून देण्यासाठी अशा प्रकारच्या स्पर्धा घेतल्या जातात. या स्पर्धेत रेवा कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन करत आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेतली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पदके आणि सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच होतकरू कलाकांराना प्रोत्साहन देण्याच्या वचनबद्धते बद्दल महाविद्यालयाला विशेष स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

या विद्यार्थ्यांना कॉलेजच्या कला शाखेतील शिक्षिका नेहा इम्तियाज भुरे यांचे मोलाचे मार्गदर्शन केले.` विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धेत नेत्रदीपक यश मिळवून देण्यासाठी सतत पाठबळ आणि प्रोत्साहन दिले जाते.ज्यामुळे हे यश संपादन करणे शक्य झाले.

# माथेरानमधील हातरिक्षा संघटनेच्या आणखी सात सदस्यांचा भाजपत प्रवेश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून अन्यायाविरुद्‌ध आवाज उठवण्यासाठी माथेरानमधील हातरिक्षाचालक संघटनेच्या आणखी सात सदस्यांनी भाजपत जाहीर प्रवेश केला आहे. या सर्वांचे भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षात स्वागत केले.

माथेरानमध्ये हातरिक्षाचालकांचे ई–रिक्षाद्‌वारे पुनर्वसन करण्याचा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने ६ ऑगस्ट २०२५ रोजी दिला होता, मात्र या निर्णयाला अनेक महिने उलटूनही अद्याप ९४ पैकी ७४ हातरिक्षा चालक ई–रिक्षाच्या प्रतीक्षेत आहेत. प्रशासकीय दिरंगाई, स्थानिक सनियंत्रण समितीकडून रिक्षांची संख्या निश्चित करण्यास होणारा विलंब तसेच या प्रकरणात होत असलेल्या कथित राजकीय द्‌वेषाला कंटाळून अखेर श्रमिक रिक्षा चालक–मालक संघटनेच्या सदस्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. या अन्यायाविरुद्‌ध आवाज उठवण्यासाठी यापूर्वी संघटनेच्या काही सदस्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता.

यानंतर बुधवारी अक्षय सपकाळ, मनोज रेनोसे, अफजल डोंगरे, संतोष निचिंदे, अली डोंगरे, अरफाद शेख आणि शहजाद शेख या आणखी सात सदस्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पनवेल येथे भाजपचे कमळ हाती घेतले.

या पक्षप्रवेशावेळी माथेरान भाजप शहराध्यक्ष व नगरसेवक प्रवीण सपकाळ, उपनगराध्यक्ष संतोष शेलार, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, प्रदीप घावरे, राजेश चौधरी, राकेश चौधरी, दीपक शहा, दिनेश सुतार, झहुर चिपाडे, भारत कारंडे आदी उपस्थित होते. नव्याने झालेल्या पक्षप्रवेशामुळे माथेरानमधील हातरिक्षाचालकांच्या लढ्याला अधिक बळ मिळणार आहे.

पान १ वरुन

## पनवेलमध्ये नारीशक्ती वंदन अधिनियम समर्थनार्थ भव्य पदयात्रा

स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बाल कल्याण सभापती ममता म्हात्रे, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी महापौर व विद्यमान नगरसेविका कविता चौतमोल, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजपच्या जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, रमेश मुंडे, प्रल्हाद केणी, सचिव ब्रिजेश पटेल, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने महिला आणि नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

पदयात्रेची सुरुवात पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयापासून करण्यात आली. त्यानंतर बाजारपेठमार्गे जात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करून पुढे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत ही पदयात्रा पुढे सरकत ठिकठिकाणी जनजागृती करण्यात आली. संपूर्ण पदयात्रेदरम्यान घोषणाबाजी, फलक आणि बॅनरच्या माध्यमातून नारीशक्ती वंदन अधिनियमाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहचविण्यात आले. यावेळी या कायद्याच्या समर्थनार्थ स्वाक्षरी मोहीमही राबविण्यात आली, ज्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या मनोगतातून या अधिनियमाचे महत्त्व अधोरेखित केले. लोकसभा व राज्य विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा हा कायदा महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने एक क्रांतिकारी पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले. या निर्णयामुळे धोरणनिर्मितीत महिलांचा सहभाग वाढून देशाच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नारीशक्ती वंदन अधिनियम हा केवळ आरक्षणाचा कायदा नसून महिलांच्या सन्मानाचे आणि समान हक्कांचे प्रतीक आहे. या माध्यमातून सामान्य कुटुंबातील कर्तृत्ववान महिलांना राजकारणात येण्याची संधी उपलब्ध होणार असून देशाच्या प्रगतीत महिलांचा सहभाग अधिक बळकट होणार आहे, असे सांगून आमदार प्रशांत ठाकूर यांनी पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या महिलांचे व नागरिकांचे आभार मानले व हे विधेयक मान्य होईपर्यत आणि त्यानंतरही पाठिंबा कायम रहावा तसेच नारी शक्ती वंदन अधिनियमला पाठिंबा देण्यासाठी ९६६७१७३३३३ या नंबरवर मिस्ड कॉल द्यावा, असे आवाहन केले.

भविष्यातही महिलांच्या हक्कांसाठी व सक्षमीकरणासाठी अशा जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन सातत्याने करण्यात येईल, असा निर्धार जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी यावेळी व्यक्त केला. विकसित भारताच्या निर्मितीसाठी महिलांच्या शक्तीचा प्रभावीपणे उपयोग करून घेण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे सांगून हा कायदा भारताच्या लोकशाही व्यवस्थेत महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण आणि क्रांतिकारी पाऊल ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

पदयात्रेत भाजप शहर अध्यक्ष व नगरसेवक सुमित झुंजारराव, महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष व नगरसेविका रूचिता लोंढे, नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, दिनेश खानावकर, मधु पाटील, अजय बहिरा, दशरथ म्हात्रे, रवींद्र भगत, नरेश ठाकूर, प्रदीप भगत, नगरसेविका दर्शना भोईर, अस्मिता घरत, शिवानी घरत, प्रतिभा भोईर, प्रिती जॉर्ज, सरस्वती काथारा, परेशा पटेल, हेमलता गोवारी, शीला भगत, राजेश्री वावेकर, मोनिका महानवर, मनाली ठाकूर, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका नीता माळी, सुहासिनी शिवणेकर, सुलोचना कल्याणकर, सुशीला घरत, नलिनी शेलार, सारिका भगत, अनुराधा ठोकळ, वर्षा नाईक, स्वाती कोळी, शहर सरचिटणीस अमित ओझे, रूपेश नागवेकर, निलेश म्हात्रे, केदार भगत, प्रीतम म्हात्रे, योगेश लहाने, सीमा घरत, लीना पाटील, अभिलाषा ठाकूर आदी सहभागी झाले होते.

या पदयात्रेदरम्यान भारत माता की जय, वंदे मातरम, छत्रपती शिवाजी महाराज की जय, राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचा विजय असो, राजमाता जिजाऊ यांचा विजय असो, झाशीची राणी लक्ष्मीबाईंचा विजय असो, पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा विजय असो, नारीशक्ती देशाची प्रगती, स्त्री सन्मान देशाचा अभिमान, नारी शिकवा नारी वाचवा, सशक्त नारी सशक्त भारत, सशक्त नारी समर्थ राष्ट्र, तिच्या कष्टाने उभा राहतो संसार नारीशक्तीमुळेच उजळतो प्रत्येक परिवार अशा गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

## सीबीएसई दहावीच्या परीक्षेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा शंभर टक्के निकाल

शाळेतील २७ विद्यार्थ्यांनी डेटा सायन्समध्ये, १६ विद्यार्थ्यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्समध्ये, तर सहा विद्यार्थ्यांनी मराठी विषयात १००पैकी १०० गुण मिळवले आहेत. याशिवाय इंग्रजी आणि सामाजिक शास्त्र विषयातही प्रत्येकी एका विद्यार्थ्याने पैकीच्या पैकी गुण मिळवण्याची कामगिरी केली आहे.

या देदीप्यमान यशाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, सदस्य ॲड. राहुल घरत तसेच प्राचार्या राज अलोनी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच शिक्षक व पालकांच्या सहकार्याचाही उल्लेख केला. विद्यार्थ्यांची जिद्द, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि व्यवस्थापनाचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व यामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या निकालामुळे रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने शैक्षणिक क्षेत्रातील आपले अग्रस्थान पुन्हा एकदा सिद्‌ध केले आहे.



# बेलापूर गावाची स्मार्ट व्हिलेजच्या दिशेने वाटचाल

## आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या प्रयत्नांना यश

**नवी मुंबई : बातमीदार**



बेलापूर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार मंदा म्हात्रे यांच्या सहकार्याने विविध विकासकामांना वेग देण्यात येत असून बेलापूर गाव आता स्मार्ट व्हिलेजच्या दिशेने वाटचाल करत आहे. गावामध्ये आधुनिक सुविधा उपलब्ध करून देत नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी नियोजनबद्‌ध पद्‌धतीने कामे हाती घेण्यात आली आहेत व काही कामे पूर्णत्वास जात आहेत.

बेलापूर गावांमध्ये अमृतेश्वर तलावासमोरील सभामंडपाच्या आवारात काँक्रीटीकरण (रु. ३५ लाख), बेलापूर गाव येथे अमृतेश्वर तलावासमोर सभामंडप (रु. १५ लाख ), बेलापूर गाव येथे ब्रिज खालून रस्ता तयार करणे (रु. ७५ लाख), बेलापूर गाव सेक्टर २० येथे भाजी मार्केट (रु. ५० लाख), बेलापूर येथील मच्छीमार्केट लगत संरक्षण भिंत उभारणे (रु. २४ लाख), बेलापूर विभागातील बेलापूर गाव येथे क्रीडा संकुल उभारणे व इतर समाज उपयोगी कामे करणे (रु. १८ कोटी), बेलापूर गाव येथे भूखंड क्र. बी ३२, बी ३३ शेजारील जागेवर खेळाचे मैदान, पार्किंग इमारत, तलावाचे शुशोभीकरण, गाळे बांधणे, बहुद्देशीय इमारत, मार्केट उभारणे, बेलापूर गावातील कुस्तीच्या मैदानावर आधुनिक क्रीडा संकुल उभारणे,बेलापूर मतदार संघातील शहाबाज, बेलापूर– सेक्टर २० येथे ओपन जिम उभारणे व इतर स्थापत्य कामे करणे (रु. २० लाख), रस्त्यांचे मजबुतीकरण, सांडपाणी व्यवस्थापन, स्ट्रीट लाईट्स, सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण तसेच डिजिटल सुविधा यांसारख्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामुळे गावाचा सर्वांगीण विकास साधला जात असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

आमदार मंदाताई म्हात्रे या नेहमीच स्थानिक नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर तत्काळ उपाययोजना करण्यासाठी कटिबद्‌ध असून बेलापूर गावाला आदर्श स्मार्ट व्हिलेज बनवण्याचा त्यांचा संकल्प आहे.

# उरण पालिकेत २४ ठरावांना मंजुरी

## नागरिकांच्या हितासाठी भाजपचा पुढाकार

**उरण : वार्ताहर**

उरण नगर परिषदेच्या सर्वसामान्य सभेत बुधवारी (दि.१५) झालेल्या भाजपने मांडलेल्या २४ ठरावावर संमतीची मोहर मारली गेल्याने उरण नगर परिषदेत भाजपचेच वर्चस्व असल्याचे सिद्ध झाले.

काही महिन्यांपूर्वी झालेल्या उरण नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपच्या वर्चस्वाला धक्का देत महाविकास आघाडीने नगराध्यक्ष पदावर विजय संपादन केला होता.मात्र नगराध्यक्ष पद गेले तरी भाजपने २१ पैकी १२ जागांवर नगरसेवक निवडून आणून बहुमत सिद्ध केले होते.



शहराच्या विकास संदर्भात भाजपने आणलेल्या तब्बल २४ ठरावांना विरोधकांनी विरोध करुनही भाजपने बहुमताच्या जोरावर संमती मिळवली. विरोधकांनी लोकहिताच्या ठरावांना विरोध करण्याचा प्रयत्न केला, मात्र भाजपने हा विरोध धुडकावून आपल्या बहुमताने हे सर्व ठराव पारित करून घेतले. उरणच्या विकासासाठी भाजपाच कटिबद्ध असल्याचे यावेळी सिद्ध झाले.

उरण शहरासाठी आमदार महेश बाली यांनी करोडोंचा निधी आणला असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली यापुढेही भाजपा उरण शहराचा कायापालट करण्यास कटिबद्ध असल्याचा ठाम विश्वास भाजपा उरण शहराध्यक्ष कौशिक शहा यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी भाजप उपनगराध्यक्ष रवी भोईर, माजी नगराध्यक्षा तथा विद्यमान नगरसेविका सायली म्हात्रे, नगर सेवक जयविंद्र कोळी, गणेश पाटील, राजू ठाकूर, जसीम गॅस, रजनी कोळी, रिबेका मढवी, पूर्वा वैवडे, रोहित पाटील,सायली पाटेकर, दमयंती म्हात्रे यांनी आनंद व्यक्त केला. उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, विशाल पाटेकर, माजी नगरसेवक शेख आदी उपस्थित होते.

# करंजाडे वसाहतीत खड्ड्यांच्या दुरुस्तीला सिडकोकडून सुरुवात

## भाजप विभागीय अध्यक्ष समीर केणी यांच्या पाठपुराव्याला यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिडकोच्या करंजाडे वसाहतीतील सेक्टर १, २ परिसरातील रस्त्यांची दैनावस्था झाली आहे. त्या ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले होते. याबाबत वडघर विभागीय अध्यक्ष समीर केणी, वडघर ग्रामपंचायत माजी सरपंच शशिकांत भोईर यांनी सिडकोकडे केलेल्या पाठपुराव्यामुळे अखेर सिडकोकडून रस्त्यांची दुरुस्तीला सुरुवात झाली असून पारिसर खड्डेमुक्त होणार आहे.



करंजाडे वसाहतीमध्ये दोन लाखांच्या आसपास लोकसंख्या पोहोचली आहे. त्याचबरोबर नवी मुंबई विमानतळ प्रकल्पासाठी चिंचपाडा, कोपर, कोल्ही या गावांचे पुनर्वसनदेखील करंजाडे परिसरात केले आहे. त्यामुळे नागरिकांची रहदारीचे प्रमाण वाढले आहे. करंजाडे येथील सेक्टर १, २ परिसरात मोठमोठे खड्डे पडले होते. काही ठिकाणचे रस्ता पूर्णपणे उखडून गेला आहे. रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे सिडको अधिकाऱ्यांनी करंजाडे वसाहतीची पाहणी करून खड्डे लवकरात लवकर दुरुस्त करावे यासाठी भाजपचे वडघर विभागीय अध्यक्ष समीर केणी, वडघर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शशिकांत भोईर यांनी मागणी केली होती. त्यानुसार खड्डे दुरुस्तीला सुरुवातील केली असून लवकरच वसाहतीतील परिसर खड्डे मुक्त होणार आहे.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे विद्यार्थी 'मास्टरमाइंड्स'




**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या मास्टरमाइंड्स राज्य आणि राष्ट्रीय स्तरीय स्पर्धेत सुवर्णयशाची मोहोर उमटवली आहे. याबद्दल संस्थेचे चेअमरण लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव एस. टी. गडदे, सदस्य ॲड. राहुल घरत, प्राचार्या राज अलोनी यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना चषक व प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेत शाळेतील ६६७ विद्यार्थ्यांनी इंग्रजी, विज्ञान, गणित, भूगोल आणि सामान्य ज्ञान या विषयांमध्ये सहभाग नोंदवला होता. शालेय स्तरावरील या स्पर्धेत ६४५ विद्यार्थ्यांनी ए प्लस आणि एफ ग्रेड मिळवून राज्य स्तरासाठी पात्रता सिद्ध केली. राज्य स्तरावरील मास्टरमाइंड्स स्पर्धेत ११७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, ज्यापैकी २६ विद्यार्थ्यांनी मानाचे रँक मिळवून चषक आणि प्रमाणपत्रे पटकावली.

यशाची ही मालिका राष्ट्रीय स्तरावरही कायम राहिली असून एकूण ७५ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य दाखवले. यामध्ये ज्युनिअर केजीचा विश्वंक पाटील, चौथीचा सार्थक पाटील आणि आठवीची अंजना सिक्धा यांनी राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या गौरव सोहळयामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांमधील सांघिक कार्य, स्वयंशिस्त आणि कष्टाच्या जोरावर मिळालेल्या या यशामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# कळंबोलीत नवीन सुसज्ज रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव

## महापालिकेची मंजुरी | उपमहापौर प्रमिला पाटील यांचा पाठपुरावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली परिसरातील वाढती लोकसंख्या आणि आरोग्य सुविधांची कमतरता लक्षात घेता सेक्टर ५ई, प्लॉट क्र. ९ येथे आधुनिक व सुसज्ज रुग्णालय उभारण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव पुढे आला आहे. उपमहापौर प्रमिला रविनाथ पाटील यांनी याबाबत पनवेल महानगरपालिकेकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर वैद्यकीय आरोग्य विभागाने या प्रस्तावावर सकारात्मक प्रतिसाद देत पुढील कार्यवाही सुरू केली आहे.



प्राप्त माहितीनुसार कळंबोली परिसर झपाट्याने विकसित होत असून येथे लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे, मात्र अद्ययावत आणि सर्व सुविधा असलेले रुग्णालय उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना उपचारासाठी दूर जावे लागते. यामुळे वेळ व आर्थिक खर्च वाढत असल्याची बाब अधोरेखित करण्यात आली आहे.

प्रस्तावित रुग्णालयात २४x७ आपत्कालीन सेवा, आयसीयू व एनआयसीयू सुविधा, प्रसूती व स्त्रीरोग विभाग, बालरोग विभाग, जनरल व स्पेशालिटी ओपीडी तसेच आधुनिक डायग्नोस्टिक सेंटर अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्याची योजना आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक नागरिकांना जलद, दर्जेदार आणि परवडणारी आरोग्य सेवा मिळणार असून परिसराच्या सर्वांगीण विकासालाही चालना मिळेल.

दरम्यान, महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिलेल्या पत्रानुसार यापूर्वी कोविड काळात कळंबोली येथील डीसीएच रुग्णालय बंद केल्यानंतर त्या इमारतीचा वापर संसर्गजन्य आजारांवरील उपचारासाठी करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. या अंतर्गत ऑक्सिजन बेड्स व आयसीयू बेड्ससह 'इन्फेक्शस डिसीज हॉस्पिटल' उभारण्याची योजना आहे. या रुग्णालयात स्वाईन फ्लू, मलेरिया, डेंग्यू, कोविड-१९, मिजल्स, हिपॅटायटिस बी, टायफॉईड, चिकनपॉक्स, निमोनिया आदी आजारांवर उपचार करण्यात येणार आहेत.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांसाठी प्रसूती सेवेसाठी स्वतंत्र मातृत्व व बाल रुग्णालय उभारण्याचाही प्रस्ताव आहे. या रुग्णालयात बाह्यरुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, अतिदक्षता विभाग, महिला वॉर्ड, नवजात अतिदक्षता कक्ष, शस्त्रक्रिया विभाग, प्रयोगशाळा, एक्स-रे विभाग, रक्तपेढी आदी सुविधा उपलब्ध राहणार आहेत.

या सर्व प्रस्तावांमुळे कळंबोली व पनवेल परिसरातील आरोग्य व्यवस्थेत मोठी सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. नागरिकांना स्थानिक पातळीवरच अत्याधुनिक आरोग्य सुविधा मिळाल्यास त्याचा थेट फायदा सर्वसामान्यांना होईल, असे उपमहापौर प्रमिला पाटील यांनी म्हटले आहे.





**पनवेल : शिवाजी नगर येथे हिरामण ठाकूर यांच्या घरी अंबा भवानी मातेची स्थापना व पूजा विधी करण्यात आला. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दर्शन घेतले. कृष्णाशेठ ठाकूर, परेश ठाकूर, अरुण ठाकूर, पंढरीनाथ ठाकूर, गजानन ठाकूर, किशोर ठाकूर, रूपेश ठाकूर, शशिकांत ठाकूर, भास्कर पाटील, राधा ठाकूर, कल्पना ठाकूर, रजनी ठाकूर, नंदा ठाकूर, लता ठाकूर अशा म्हात्रे आदी उपस्थित होते.**

# मृत महिलेच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील चिंचवली व वाकडी गावाच्या सिमेजवळ, पनवेल-दुंदरे रोडपासुन सुमारे २०० मीटर अंतरावर दक्षिणेस राजमाती या वनविभागाच्या जागेतील झुडुपामध्ये, एका महिलेचा अर्धवट जळाले ल्या अवस्थेत सापडून आला असून तिच्या नातेवाईकांचा शोध त्याचप्रमाणे तिला कोणी जाळले असावे याचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत .

एक अनोळखी महिला वय अंदाजे २५ ते ५० वर्षे, उंची ४ फुट १० इंच, अर्धवट जळालेली, डोक्याचे वरील केस लांब अर्धवट जळालेले, उजव्या कानात सफेद धातुचा टॉप्स, डाव्या हातातील मधल्या बोटात सफेद धातुची अंगठी, नाकात सफेद धातुची नथ, त्यावर बारीक खडे असलेली, दोन्ही हाताचे मनगटावर लाल पिवळा धागा बांधलेला, दोन्ही पायाचे अंगठयाचे नखाला लालसर नेलपॉलीश लावलेले, कमरेखाली नेसलेल्या वस्त्राचा स्टील हुक, कमरेखाली नेसलेल्या वस्त्राचा काळया रंगाचा अर्धवट जळालेला तुकडा आहे. कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून अज्ञात पध्दतीने व हत्याराने जिवे ठार मारून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने कोणत्या तरी ज्वलनशिल पदार्थाने तिचा मृतदेह जाळुन टाकला म्हणुन गुन्हा पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असून या संदर्भात कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी वपोनि गजानन घाडगे मोबाईल नंबर ८९७५८०९४१० येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पळस्पे येथे आज छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासन आपल्या दारी' या संकल्पनेतून पनवेल तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, पळस्पे येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे आयोजन शुक्रवार, १७ एप्रिल रोजी सकाळी १० वा.करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये शेतकऱ्यांसाठी महाविस्तार AI ॲप नोंदणी व फार्मर आयडी रजिस्ट्रेशन, निवडणूक ओळखपत्राचे SIR मॅपिंग, आधार कार्ड अपडेट, आयुष्यमान भारत कार्ड, आरोग्य सुविधा, कृषी विभागाच्या सुविधा, रेशन कार्ड संबंधित सुविधा, ७/१२ संबंधित सुविधा, विविध प्रकारचे दाखले ई अर्ज स्वीकारले जातील आणि दाखल्यांचे वाटप केले जाईल.

शिबिरास येताना नागरिकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक, जमीन विषयक सात बारा उतारा इ. इतर आवश्यक पूरक कागदपत्रे कागदपत्रे सोबत ठेवावीत. यावेळी प्रांताधिकारी पवन चाडंक, तहसीलदार मिनल भामरे भोसले, नायब तहसीलदार राजश्री जोगी, मंडळ अधिकारी शशिकांत सानप व पळस्पे मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक आणि इतर विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. प्रशासनाने नागरिकांना या शिबिराचा लाभ घेण्यासाठी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.









**पनवेल : भारतीय लोकशाहीतील ऐतिहासिक आणि परिवर्तनकारी टप्पा मानल्या जाणाऱ्या नारीशक्ती वंदन अधिनियम या कायद्याबाबत जनजागृती करण्यासाठी व जनसमर्थन मिळविण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने गुरुवारी पनवेल शहरात भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम यांच्या नेतृत्वाखाली ही पदयात्रा मोठ्या उत्साहात पार पडली.**

## संपादकीय

# विश्वासार्हता आणि नैतिकता

करुणा, प्रामाणिकपणा आणि नैतिक मूल्यांचे भान ही वैद्यकीय सेवाक्षेत्राची तीन महत्वाची अंगे आहेत, आणि नव्याने या क्षेत्रात येणाऱ्या तरुणांनी याची जाणीव ठेवली पाहिजे, असा सल्ला राष्ट्रपतींनी दिला, तेव्हा या क्षेत्रातील अप्रिय अनुभवांमुळे त्रस्त झालेल्या सामान्यांच्या मनातील अपेक्षा पालवल्या असतील यात शंका नाही.

**'धन्वंतरी' अशी ख्याती असलेल्या अनेक नामवंत डॉक्टरांची आणि सेवाभावी वैद्यकीय संस्थांची एक मोठी परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. मात्र, अलीकडच्या काळात राज्याच्या वैद्यकीय क्षेत्रात 'सेवा' कमी आणि 'व्यापार' अधिक होत असल्याची भावना व्यक्त होते. आज अनेक रुग्णालये आणि इस्पितळे कॉर्पोरेट कंपन्यांच्या हातात असल्याने, 'रुग्ण सेवा' आणि 'महसूलवाढीची उद्दिष्टे' यांमध्ये मोठा संघर्ष सुरू असून आरोग्यसेवेतील नैतिकतेचा मुद्दा पणाला लागला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुधवारी नागपूरमध्ये ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (एम्स) च्या दीक्षान्त समारंभातच हा मुद्दा अधोरेखित करून या क्षेत्राला आरसा दाखविला ही समाधानाची बाब आहे. कारण, अनावश्यक लॅब टेस्ट्स, महागडी औषधे आणि अनेकदा गरज नसतानाही केल्या जाणाऱ्या शस्त्रक्रिया यांतून रुग्णांच्या हतबलतेचा फायदा घेतला जातो, अशीच सर्वसमान्यांची भावना असते. या क्षेत्रातील 'कट प्रॅक्टिस' हा नैतिक अधःपतनाचा मोठा पुरावा आता लपून राहिलेला नाही. एका डॉक्टरने दुसऱ्या तज्ज्ञाकडे किंवा लॅबकडे रुग्ण पाठवल्यानंतर त्याबदल्यात मिळणारे कमिशन ही एक अनिष्ट प्रथा बनली आहे. ही रक्कम थेट रुग्णाच्या उपचारांवरील खर्चातूनच वसूल केली जात असल्याने याचा थेट आर्थिक फटका सामान्य रुग्णाला बसतो. त्यामुळे या क्षेत्राची नैतिकता अगोदरच पणाला लागलेली आहे. खाजगी महाविद्यालयांमधील कोट्यवधींचे शिक्षण शुल्क ही या व्यवसायातील कमाईचा परतावा मिळविण्याची गुंतवणूक ठरली आहे. पदवीसाठी झालेला हा अफाट खर्च वसूल करण्याच्या मानसिकतेतून अनेक तरुण डॉक्टरांमध्ये धंदेवाईकपणा वाढीस लागत आहे. त्यामुळे, वैद्यकीय शिक्षण हे 'ज्ञान संपादन' न राहता 'गुंतवणूक' बनत चालल्यामुळे या व्यवसायाचे स्वरूप बदलणे गरजेचे ठरले आहे. राष्ट्रपतींनी दिलेल्या सल्ल्यामुळे पुन्हा एकदा ऐरणीवर आलेला नैतिकतेचा मुद्दा व जनतेच्या अपेक्षा यांची योग्य सांगड घालायची असेल, तर खाजगी रुग्णालयांत मिळणाऱ्या अत्याधुनिक सुविधा सरकारी रुग्णालयांत उपलब्ध करून देणे हा महत्वाचा उपाय ठरतो. कारण वैद्यकीय व्यवसाय हा केवळ उपजीविकेचे साधन नसून तो विश्वासावर आधारलेला आहे. या क्षेत्रातील नैतिकता जपण्यासाठी काही महत्त्वाच्या पावलांची गरज आहे. त्याकरिता गरज असेल तर वैद्यकीय अभ्यासक्रमात ' या व्यवसायाच्या नीतीमूल्यांचे धडे देणारे पाढे समाविष्य करावयास हरकत नाही. कारण जाणिवा जाग्या करण्यासाठी संस्कार घडविणे ही आजच्या काळाची गरजदेखील आहे. हे पाढे केवळ पुस्तकी असू नयेत, तर त्या शिक्षणाचा व्यवहारात वापर होतो किंवा नाही हे तपासण्याचे काही मापदंडही निश्चित केल्यास राष्ट्रपतींनी अधोरेखित केलेला हा मुद्दा सामन्य जनतेस दिलासा देणारा ठरेल. आजही अनेक डॉक्टर अत्यंत प्रामाणिकपणे आणि अत्यल्प दरात सेवा देत आहेत, ही आशेची बाजू आहे. मात्र, संपूर्ण क्षेत्राची प्रतिमा सुधारण्यासाठी 'नफा' यापेक्षा 'रुग्णहित' हेच केंद्रस्थानी असणे काळाची गरज आहे. या अनैतिकतेची दखल घेऊन सरकारने कायदे केले, काही कारवायाही झाल्या, पण या क्षेत्राने सामाजिक भान ठेवणे ही सर्वाधिक महत्वाची गोष्ट आहे. कारण हा 'धंदा' नसून 'सेवा' आहे.**

# नादुरूस्त बांधबंदिस्तीमुळे शेतकऱ्यांसमोर संकट

खबरबात
प्रकाश सोनवडेकर

अलिबाग, मुरूड आणि श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यांवर तालुक्यांत भरतीमुळे मोठ्या प्रमाणात बंधाऱ्यांची धूप झाली आहे. नादुरुस्त खार बंधाऱ्यांमुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. दरवर्षी पावसाळ्यात येणाऱ्या उधाणाच्या पाण्यामुळे किनारपट्टीलगतचे संरक्षणात्मक बंधारे कमजोर झाले आहेत, मात्र त्यांच्या दुरुस्तीसाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे पाठविलेला ७५कोटी ८६ लाख रुपयांचा प्रस्ताव मागील चार वर्षांपासून प्रलंबित आहे. खारबंदिस्ती फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी शेतजमिनीमध्ये घुसून शेतजमीन नापीक बनत आहे. काही गावांमध्ये उधाणाचे पाणी घुसून घरांचे नुकसान होत आहे. त्यामुळे खारबंदिस्तीची दुरुस्ती होणे आवश्क आहे.



सीआरझेड नियमांमुळे या कामांना मंजुरी मिळण्यात विलंब झाला; मंजुरी मिळाल्यानंतरही निधीअभावी कामे सुरू होऊ शकलेली नाहीत. जिल्ह्यातील खारभूमी भागात भात, नारळ आणि मत्स्यशेती मोठ्या प्रमाणावर केली जाते. ही जमीन उच्चतम भरती रेषेपेक्षा सुमारे दोन मीटर खाली असल्याने खारे पाणी शेतांमध्ये सहज शिरते. त्यामुळे शेती नापीक होण्याचा धोका वाढला असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. खारभूमी विभागाने उभारलेल्या बंधाऱ्यांची दरवर्षी डागडुजी आवश्यक असते. पूर्वी ग्रामस्थ लोकसहभागातून ही कामे करत होते; मात्र सध्या शासकीय मदत वेळेत न मिळाल्याने दुरुस्ती रखडली आहे.

कोकणात रायगड, रत्नागिरी, ठाणे आणि पालघर या पाच जिल्ह्यात ४९हजार ११३ हेक्टर येवढे खारभुमी लाभक्षेत्र आहे. यात रायगड जिल्ह्यातील २१ हजार २९६ हेक्टर खारभुमी क्षेत्राचा समावेश आहे. यातील अलिबाग तालुक्यातील ३ हजार १६ हेक्टर खारभुमी क्षेत्र उधाणामुळे कायमचे नापिक झाले आहे. या क्षेत्रासाठी खारलॅण्ड विभागाने १६५ सरकारी बंदिस्ती योजना आखल्या आहेत; पण या योजना राबविण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध होत नसल्याची ओरड वेळोवेळी केली जात आहे. अनेकदा खारबंदिस्ती फुटल्याने शेतात खारे पाणी शिरते. यामुळे शेतीचे नुकसान होत आहे.

अलिबाग तालुक्यात धरमतर खाडीकिनाऱ्यावरील शहापूर–थेरंडच्या पूर्व भागातील एकूण १० खारबंदिस्ती नादुरुस्त झाल्या आहेत. यातून मोठ्या प्रमाणात खारे पाणी परिसरात पसरत असून परिस्थिती गंभीर होत आहे. समुद्राला येणाऱ्या उधाणामुळे किनारपट्टीवरील गावांना सातत्याने तडाखा बसतो आहे. खारबंदीस्ती फुटल्याने समुद्राचे पाणी शेतात आणि गावात शिरण्याच्या घटना वाढल्या आहेत. त्यामुळे शेतकरी धास्तावले आहेत.समुद्राला येणाऱ्या उधाणांमुळे गेल्या दोन दशकात अलिबाग तालुक्यातील खारेपाट विभागातील शेती कायमची नापिक झाली आहे. पूर्वी ज्या ठिकाणी शेती केली जात होती. अशी साडे तीन हजार हेक्टर क्षेत्रावर आज कांदळवने पसरली आहेत. येथील शेतकरी शेतीपासून कायमचे दूरावले गेले आहेत. यात प्रामुख्याने माणकुळे, बहिराचा पाडा, नारंगी खार, रामकोठा, सोनकोठा, हाशिवरे, कवाडे, फुफादेवी, मेढेखार, मिळकतखार, शाहाबाज यासारख्या गावातील शेतजमिनींचा समावेश आहे. मात्र शेती नापिक होऊनही शेतकऱ्यांना शासनाकडून एक रुपयाची मदत मिळू शकलेली नाही.

खारेपाट विभागात शेतकरी तलावांमध्ये मत्स्यशेती करतात. उधाणामुळे त्यांचे देखील नुकसान होते. भरतीच्या वेळेला वेगाने आलेले पाणी तलावात घुसून तलावांचे बांध फुटतात व बीज व विक्रीयोग्य मासे वाहून जाऊन त्यांचेदेखील नुकसान होते. पावसात भातशेती पाण्याने पूर्णपणे भरते अशा स्थितीत शेत तलावात सोडलेले मत्स्यजीव वाहून जातात.

समुद्राला येणाऱ्या उधाणापासून संरक्षण व्हावे म्हणून किनारपट्टीवरील भागात खारबंदिस्ती केली जाते. या बांधबंदिस्तीची जबाबदारी खारभुमी विभागाकडे असते. निधी आभावी बरेचदा बंधाऱ्यांची देखभाल योग्य प्रकारे होत नाही. या बंधाऱ्यांना तडे जातात. यामुळे उधारणाचे पाणी लगतच्या शेतजमिनी शिरते आणि त्या नापिक होतात.

उधाणाचे पाणी घुसून शेतजमीन नापीक होऊनये म्हणून शासनाने खारबंदिस्ती बांधल्या. त्यामुळे शेत जमिनीचे संरक्षण झाले. परंतु कित्तेक वर्षे या बंदिस्तींची दुरस्ती झाली नाही. त्यामुळे बंदिस्तीना भगदाड पडली. त्यातून उधाणाचे पाणी शेतात शिरू लागले. आता उधाणाचे पाणी गावात , वस्तीत शिरू लागले. पावसाळ्यात मोठी भरती आली की अलिबाग तालुक्यातील काही गावांमध्ये पाणी शिरून नुकसान होते. खारबंदिस्ती दुरुस्त न केल्यामुळे पाणी गावात शिरते. शासनच्या वेगवेगळ्या विभागांमध्ये समन्वय नसल्यामुळे काही खारबंदिस्ती प्रकल्प रखडले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. शासानाच्या वेगवेगळ्या विभागांनी समन्वय साधून खारबंदीस्ती दुरुस्तीची कामे तातडीने केली पाहिजेत.

# सायली शिंदेच्या मार्बल ऑरगॅनिक्सला 'उमेद'ची साथ

महिला सशक्तीकरणाच्या दिशेने शासन विविध योजना राबवत असताना, त्या योजनांचा योग्य लाभ घेत स्वतःचा उद्योग उभा करणाऱ्या महिलांची संख्या वाढत आहे. अशाच प्रेरणादायी महिलांपैकी एक म्हणजे रेवणगाव येथील सायली राजेंद्र शिंदे. त्यांनी उमेदच्या मदतीने हिरकणी कक्षाच्या माध्यमातून मार्बल ऑरगॅनिक्स या ब्रँडच्या माध्यमातून आयुर्वेदिक व हर्बल कॉस्मेटिक उत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले आहे.

कोरोनासारख्या आव्हानाला तोंड देताना सायली व त्यांचे पती राजेंद्र शिंदे यांनी सॅनिटाजझर निर्मिती सुरू केली. यातून त्यांच्या सौंदर्य उत्पादनांच्या व्यवसायाला दिशा मिळाली. प्रारंभी मार्बल ऑरगॅनिक्स जेल यासह एक दोन उत्पादने केली जात, मात्र व्यवसायवाढीचा विचार सायली यांना खुणावत होता. सायली पूर्वीपासूनच वेगवेगळ्या बचत गटांमध्ये सक्रिय कार्यरत होत्या. त्यातून त्यांनी स्वतःचा हिरकणी स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन केला. या बचत गटाच्या मदतीने दोन टप्प्यात सात लाख रूपयांचे आर्थिक पाठबळ मिळाले. त्यानंतर दोन उत्पादनांवरून आज मार्बल ऑरगॅनिक्स वेगवेगळ्या प्रकारची 12 सौंदर्यप्रसाधने तयार करते.

या प्रवासाबद्दल सांगताना सायली शिंदे म्हणाल्या, मार्बल ऑरगॅनिक्स आज फेसवॉश, डे नाईट क्रीम, लिप बाम अशी 12 प्रकारची सौंदर्य उत्पादने तयार करते. त्यासाठी आवश्यक ते परवाने आम्ही घेतले आहेत. आमच्या उत्पादनांमध्ये कोणतीही रसायने वापरली जात नसून, ती पूर्णपणे नैसर्गिक साधनसामग्रीपासून तयार केली जातात. यासाठीचा कच्चा माल रत्नागिरी, मुंबई, गुजरात, दिल्ली येथून आणतो. पती यांच्यासोबतच सासू सासरे यांनीही दिलेल्या पाठिंब्यामुळे आज आपण ही प्रगती साधली असल्याचे त्यांनी सांगितले.

मार्बल ऑरगॅनिक्समुळे केवळ एक उद्योगच उभा राहिला नाही, तर स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधीही निर्माण झाल्या. आज कं मार्बल ऑरगॅनिक्समध्ये पाचच्या आसपास महिला काम करतात. ग्रामीण भागातील महिलांना कामाची संधी मिळाल्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होत आहे. उमेदच्या साथीने वाढलेला हा प्रवास 50 महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यापर्यंत वाढवायचा मानस सायली शिंदे व्यक्त करतात. यातून गावातील महिलांना कामाची संधी प्राप्त होऊन त्यांना स्वावलंबी आणि आत्मविश्वासपूर्ण जीवन जगण्याची संधी मिळाली आहे.

उमेदच्या माध्यमातून मार्बल ऑरगॅनिक्सच्या टीमला मोठी प्रेरणा आणि आत्मविश्वास मिळाला आहे. तर सायली शिंदे रेवणगाव गावातील महिलांसाठी आशेचा किरण आणि प्रेरणास्त्रोत बनल्या आहेत.

**–संप्रदा बीडकर, जिल्हा माहिती अधिकारी, सांगली**

## बदलते तंत्रज्ञान

### बजाजने पुन्हा लॉन्च केली 'पल्सर 180'

बजाज ऑटोने पल्सर 180 नवीन अपडेट्ससह लॉन्च केली आहे. याची सुरुवातीची एक्स–शोरूम किंमत 1.22 लाख रुपये आहे. बजाजने 2022 मध्ये पल्सर 180 चे उत्पादन बंद केले होते.



त्यानंतर कंपनीच्या पोर्टफोलिओमध्ये पल्सर 150 आणि पल्सर 220F यांच्यात खूप मोठे अंतर आले होते. आता ही बाईक ग्राहकांना 150cc आणि 220cc च्या दरम्यानचा पर्याय देखील देईल.

नवीन पल्सर 180 मध्ये 178.6cc चे सिंगल–सिलिंडर, एअर–कूल्ड इंजिन देण्यात आले आहे. हे 17hp पॉवर आणि 15Nm टॉर्क जनरेट करते. जुन्या 180 च्या तुलनेत याचा टॉर्क 0.8Nm ने वाढला आहे. हे पल्सर 150 च्या तुलनेत 3hp जास्त पॉवर आणि 1.75Nm जास्त टॉर्क देते.

डिझाइन आणि फीचर्सः क्लासिक लूकमध्ये मॉडर्न टच नवीन पल्सर 180 मध्ये ते सर्व बदल केले आहेत जे अलीकडे पल्सर 150 मध्ये पाहिले गेले होते.

LED हेडलाइटः रात्रीच्या वेळी चांगल्या दृश्यमानतेसाठी LED युनिट देण्यात आले आहे.

LCD डॅशः बाईकमध्ये नवीन निगेटिव्ह LCD डिजिटल कन्सोल मिळते.सस्पेन्शन आणि ब्रेकिंग सिस्टीम

बाईकच्या पुढील भागात 280mm डिस्क आणि मागील भागात 230mm डिस्क ब्रेकसह ABS दिले आहे. आरामदायी प्रवासासाठी पुढील भागात टेलिस्कोपिक फोर्क आणि मागील भागात ट्विन–शॉक अ‍ॅब्जॉर्बर मिळतात. याचे एकूण वजन 156 किलो आहे.

यात 15 लिटरची मोठी इंधन टाकी दिली आहे, जी लांबच्या प्रवासासाठी पुरेशी आहे.


ABS (अँटी–लॉक ब्रेकिंग सिस्टम)ः हे आपत्कालीन परिस्थितीत अचानक ब्रेक लावल्यास टायर लॉक होण्यापासून किंवा घसरण्यापासून वाचवते. यामुळे बाईक स्किड होत नाही आणि अपघाताचा धोका कमी होतो.

निगेटिव्ह LCD: यात स्क्रीन काळी असते आणि त्यावर लिहिलेले आकडे किंवा अक्षरे पांढऱ्या किंवा तेजस्वी रंगाचे असतात. याचा फायदा असा की, कडक उन्हातही डिस्प्ले स्पष्ट दिसतो.

## निमित्त

# विनोदी साहित्यिक वि.आ. बुवा

विनायक आदिनाथ बुवा हे मराठी भाषेतील विनोदी साहित्यिक होते. ते वि.आ. बुवा या नावाने प्रसिद्ध होते. त्यांनी आपल्या लेखनाचा प्रारंभ इ.स. १९५०मध्ये केला. त्यांची विनोदी शैलीतील एकूण १५०हून अधिक पुस्तकेत प्रसिद्ध झाली आहेत. त्यांनी विनोदी लेखनाबरोबरच आकाशवाणीवरील श्रुतिका, विनोदी निबंध, पटकथा, तमाशाच्या संहिता, विडंबने, एकांकिका असे विविध स्वरूपाचे लेखन केले आहे. त्यांचा आज स्मृतिदिन आहे.



वि.आ. बुवांचा जन्म पंढरपूर येथे ४ जुलै, इ.स. १९२६ रोजी झाला. त्यांचे शालेय शिक्षण त्यांनी पंढरपूर आणि मिरज येथे झाले. वडिलांच्या अकाली निधनामुळे शिक्षण अर्धवट राहिले. नोकरीसाठी ते कल्याण येथे स्थाईक झाले. मुंबई येथील व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्सगटिट्यूटमध्ये बुवा यांनी रसायनशास्त्र विभागात इ.स. १९८६मध्ये निवृत्त होईपर्यंत नोकरी केली. बुवा यांचे वक्तृत्व उत्तम असल्याने व्याख्याने व कथा–कथनासाठी महाराष्ट्रासह अन्य राज्यांमध्येही त्यांनी दौरे केले होते. संस्कृत भाषेचा त्यांचा चांगला अभ्यास होता.

सुंदर हस्ताक्षराच्या जोरावर त्यांनी इ.स. १९५०मध्ये इंदुकला नावाचा एक हस्तलिखित साहित्याचा अंक प्रकाशित केला होता. हे हस्तलिखित दर्जेदार स्वरूपात असल्याने साहित्यिकांचा चांगला पाठिंबा यास मिळाला. अनंत काणेकर, महादेवशास्त्री जोशी, चिं. वि. जोशी, दुर्गा भागवत, माधव मनोहर, गो. नी. दांडेकर, शांता शेळके, वसंत बापट, विजय तेंडुलकर आणि द. मा. मिरासदार असे गाजलेले साहित्यिक या अंकासाठी लिखाण करत असत. पुढे नवशक्ती या वृत्तपत्राचे संपादक प्रभाकर पाध्ये यांनी त्यांना वृत्तपत्रातून लिखाणासाठी उद्युक्त केले आणि त्यांनी वृत्तपत्रातून विनोदी लेखनास प्रारंभ केला. सूक्ष्म निरीक्षणशक्ती, कल्पकता आणि उत्स्फूर्त विनोद ही वि. आ.बुवा यांच्या लेखणीची वैशिष्ट्ये मानली जातात. त्यानंतर हंस दिवाळी अंक, मोहिनी दिवाळी अंक, नवयुग दिवाळी अंक, आवाज दिवाळी अंक आणि कितीतरी मासिके व दिवाळी अंकांतून बुवा लेखन करू लागले. वि. आ. बुवा यांचा पहिला कथासंग्रह अकलेचे तारे इ.स. १९५३मध्ये प्रसिद्ध झाला. महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथ आणि नाट्य पुरस्कार समित्यांवर अनेक वर्षे त्यांनी परीक्षक म्हणून काम पहिले होते. आकाशवाणीवर त्यांचे ६००हून अधिक कार्यक्रम प्रसारित झाले. त्या काळच्या पुन्हा प्रपंच या लोकप्रिय मालिकेसाठी ४००हून अधिक भागांचे लेखन त्यांनी केले. १७ एप्रिल २०११ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

**मिळालेले पुरस्कार**

इ.स. १९७२मध्ये कल्याणमध्ये झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून निवड, इ.स. १९८३ 'प्रेमाची एस्सो स्टाइल' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट विनोदी साहित्यासाठीचा पुरस्कार, इ.स. १९९७ 'शंभरावे पुस्तक' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट विनोदी साहित्यासाठीचा पुरस्कार, इ.स. १९९७ उत्कृष्ट विनोदी लेखक म्हणून मुंबई मराठी साहित्य संघाचा आचार्य अत्रे पुरस्कार.

(साभार : विकीपीडिया)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# दररोज ब्रेड खाल्ल्यास आरोग्यावर गंभीर परिणाम

अनेकांच्या सकाळच्या नाश्त्याची सुरुवात ब्रेड–बटर, ब्रेड–जाम, ब्रेड चहा/कॉफी आणि ब्रेड सँण्डविच खाल्ल्याने होते, पण ब्रेड कमीत कमी कमी करण्याचा प्रयत्न करा, कारण ब्रेड तुमच्या शरीरासाठी सर्वात धोकादायक गोष्ट असू शकते. डॉ. मिकी मेहता यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिल्यानुसार दररोज ब्रेड खाल्ल्याने ऑटो–ब्रूअरी सिंड्रोम होऊ शकतो. ही एक दुर्मीळ स्थिती आहे, जी आतड्यातील मायक्रोबायोमला ब्रेडमध्ये आढळणाऱ्या कार्बोहायड्रेट्सपासून इथेनॉल जास्त प्रमाणात तयार करण्यास अनुमती देते, ज्यामुळे अल्कोहोलयुक्त पेय न घेताही नशेची लक्षणे दिसू शकतात.




बंगळुरू येथील एस्टर व्हाइटफील्ड हॉस्पिटलमधील इंटर्नल मेडिसिन कन्सल्टंट डॉ. बसवराज एस. कुंभार म्हणाले की, एबीएस किंवा ऑटो ब्रुअरी सिंड्रोम ही अशी स्थिती आहे, ज्यामध्ये आतड्यांमधील सूक्ष्मजीवांद्वारे कार्बोहायड्रेट्सच्या किण्वनामुळे शरीरात अल्कोहोल तयार होते, ज्यामुळे नशेची लक्षणे दिसतात. याला आतड्यांचे किण्वन सिंड्रोम, असेही म्हणतात आणि ही एक अत्यंत दुर्मीळ घटना आहे.

डॉ. कुंभार यांनी चक्कर येणे, तंद्री, गोंधळ, मूड स्विंग किंवा आक्रमकता यांसारख्या लक्षणांवर लक्ष ठेवण्याचा सल्ला दिला. काही प्रकरणांमध्ये रुग्णांना अतिसार व मळमळ होण्यासह पोट फुगणे आणि पोटदुखीही होऊ शकते. अशा वेळी तुम्ही वैद्यकीय तपासणी करू शकता.

दररोज ब्रेड खाल्ल्याने हा सिंड्रोम थेट होत नाही. एबीएस सामान्यतः अँटीबायोटिकचा अतिवापर, आतड्यांतील डिस्बिओसिस किंवा यीस्टच्या अतिवृद्धीला परवानगी देणाऱ्या रोगप्रतिकार शक्ती कमी करण्यासारख्या घटकांशी जोडलेला असतो. ब्रेडमध्ये यीस्ट आणि कार्बोहायड्रेट्स असतात, परंतु, तुमचे आरोग्य पूर्णपणे चांगले असल्यास ब्रेड दररोज खाल्ल्याने एबीएस होत नाही, ज्या व्यक्तींची रोगप्रतिकार शक्ती कमकुवत आहे अशा लोकांना हा आजार होण्याची दाट शक्यता असते

सामान्य लोकांनी एबीएस टाळण्यासाठी ब्रेडचे सेवन मर्यादित करण्याची आवश्यकता नाही. नियमित आहाराचा भाग म्हणून ब्रेडचे सेवन कमी प्रमाणात करणे पूर्णपणे सुरक्षित आहे, अशी शिफारस डॉ. कुंभार यांनी केली. त्यांच्या मते, कार्बोहायड्रेट आणि साखर नियंत्रणावर लक्ष केंद्रित करून, या आजारावर उपचार करण्यास मदत मिळवू शकतो.

# रायगडातही डिजिटल जनगणनेची तयारी



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

देशातील सर्वात महत्त्वाच्या प्रशासकीय उपक्रमांपैकी एक असलेल्या जनगणनेची प्रक्रिया आता वेग घेऊ लागली आहे. रायगड जिल्ह्यात या डिजिटल जनगणनेची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. देशाच्या इतिहासातील ही १६ वी आणि स्वातंत्र्यानंतरची आठवी जनगणना असून, यावेळी पहिल्यांदाच मोबाईल ॲपच्या माध्यमातून डिजिटल पद्धतीने माहिती संकलन केले जाणार आहे.

यंदाच्या जनगणनेचे वैशिष्ट्य म्हणजे ती पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार आहे. 'सेन्सस २०२७-एचएलओ' या मोबाईल ॲपच्या माध्यमातून नागरिकांना प्रथमच स्व-गणना करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे नागरिकांना घरबसल्या स्वतःची माहिती नोंदवता येणार असून, पारदर्शकता आणि अचूकता वाढण्यास मदत होणार आहे. महत्वाचे म्हणजे जनगणनेत विचारली जाणारी वय, लिंग, शिक्षण, व्यवसाय आदी माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाणार असून ती केवळ सांख्यिकीय व विकास नियोजनासाठी वापरली जाईल.

रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात या संदर्भात सातत्याने समन्वय बैठका घेण्यात येत असून, विविध विभागांमध्ये जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. प्रत्येक गाव, वाडी आणि शहरातील सर्व घरांचा समावेश होईल, यासाठी सविस्तर नियोजन करण्यात आले आहे. जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजण्यापुरती मर्यादित नसून, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक माहितीचा महत्त्वाचा स्रोत असल्याने तिच्या अचूकतेवर विशेष भर दिला जात आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या मदतीने होणारी ही जनगणना अधिक वेगवान, अचूक आणि पारदर्शक ठरण्याची अपेक्षा असून रायगड जिल्हा प्रशासनाने त्यासाठी सर्वतोपरी तयारी केली आहे.

जनगणनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्ह्यात प्रशासकीय यंत्रणा सज्ज असून प्रगणकांमार्फत माहिती संकलित केली जाणार आहे. रायगड जिल्हयाकरिता ६९ क्षेत्रिय प्रशिक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. हे प्रशिक्षक पुढे तालुका स्तरावर तसेच नगरपालिका स्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या ५ हजार ९८ प्रगणक व ८६३ पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देणार आहेत. ३३ फिल्ड ट्रेनर्सना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. यामुळे डेटा संकलन करताना होणाऱ्या त्रुटी कमी होतील आणि प्रक्रिया अधिक परिणामकारक ठरेल.

जनगणना प्रक्रिया दोन टप्प्यांत पार पडणार असून पहिला टप्पा (घरयादी व घरगणना) १ मे ते १४ जून या कालावधीत होणार आहे. या कालावधीत १ ते १५ मे पर्यत नागरिकांना हीं संकेतस्थळावरून स्वतः माहिती भरता येणार आहे. तसेच १६ मे ते १४ जून या कालावधीत प्रगणक प्रत्यक्ष भेट देऊन मोबाईल ॲपद्वारे माहिती संकलित करतील. प्रत्यक्ष जनगणनेचा दुसरा टप्पा फेब्रुवारी २०२७ मध्ये पार पडणार आहे.

मुळात २०२१ साली होणारी जनगणना कोरोना महामारीमुळे पुढे ढकलण्यात आली होती. त्यामुळे जवळपास सहा वर्षांचा विलंब झाला. आता २०२७ मध्ये ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, अद्ययावत आणि विश्वासार्ह माहिती मिळवण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे.

जनगणना प्रक्रियेला सुरुवात होण्यापूर्वी १५ दिवसांचा कालावधी नागरिकांना स्वतःची माहिती भरण्यासाठी दिला जाणार आहे. या 'सेल्फ एन्यूमरेशन' टप्प्यानंतर १६ मे ते १५ जून दरम्यान प्रगणक घरोघरी भेट देऊन माहितीची पडताळणी व संकलन करतील. त्यामुळे प्रत्येक नागरिकाची नोंद अचूकपणे होईल, याची खात्री प्रशासनाकडून केली जात आहे.

**जनगणना ही देशाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे . जनगणनेतून जिल्ह्याचा अद्ययावत आणि अचूक डेटा तयार होणार असून, तो भविष्यातील विकास आराखड्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी स्व-गणना करून आणि प्रगणकांना सहकार्य करून या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा.**

**-डॉ. किशन जावळे, जिल्हाधिकारी**

## सिमेंट मिक्सर ट्रक खाडीत पलटी होऊन चालकाचा मृत्यू

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा परिसरात एक भीषण अपघात घडला असून सिमेंट मिक्सर ट्रक खाडीत पलटी होऊन चालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, राहुल कुमार प्रभू महतो (वय ३१, रा. बिहार, सध्या रेवदंडा) हे फिर्यादी असून ते अशोका बिल्डकॉन कंपनीच्या कॅम्पमध्ये वास्तव्यास आहेत. चुनेकोळीवाडा येथील आर.एम.सी. प्लांटवरून सिमेंट भरून ट्रक (क्र. MH ०१ CR ८२२६) साईटकडे जात असताना चालक अरविंदकुमार प्रभाशंकर (वय ३७, रा. उत्तर प्रदेश) याने ओळख असल्याने राहुल यांना ट्रकमध्ये बसवून घेतले.

रात्री सुमारे ११.१५ वाजण्याच्या सुमारास खाडी पूल पार केल्यानंतर अवघ्या ५० ते ६० मीटर अंतरावर चालकाचा गाडीवरील ताबा सुटला. रोडचा अंदाज न आल्याने मिक्सर ट्रक रस्त्याच्या डाव्या बाजूने थेट खाडीत कोसळून पलटी झाला.

प्रसंगावधान राखत फिर्यादी राहुल महतो यांनी खाडीत उडी मारून आपला जीव वाचवला. मात्र, ट्रक पाण्यात पलटी झाल्याने केबिनमध्ये पाणी शिरले आणि चालक अरविंदकुमार प्रभाशंकर हे केबिनमध्ये अडकून बुडाल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.या अपघातात फिर्यादी यांचाही डोक्याला दुखापत झाली आहे.

या प्रकरणाची नोंद रेवदंडा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पुढील तपास पीएसआय अंगज करत आहेत.

## स्वामी समर्थांच्या पालखीचे मुरूडमध्ये भक्तांकडून स्वागत



**मुरूड : प्रतिनिधी**

अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखीचे श्री स्वामी समर्थ भक्त मंडळ मुरूडच्या वतीने थाटामाटात मुरुड नगरीत स्वागत करण्यात आले. त्यानंतर पालखी शहरातील विविध ठिकाणी फिरुन गावदेवी पाखाडी येथील उदय सबनीस यांच्या निवासस्थानी पालखीचे भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात भव्य स्वागत करण्यात आले. फुलांची उधळण करीत आणि 'श्री स्वामी समर्थ'च्या जयघोषात पालखीचे स्वागत करण्यात आले.

जय जय स्वामी समर्थच्या नामघोषात महिलांवर्गा कडुन स्वामींच्या पादुकांचे पूजन व औक्षण करण्यात आले. ज्यामुळे वातावरण अत्यंत उत्साही व मंगलमय झाले. यावेळी शेकडो भाविकांनी पालखी व मूळ पादुकांचे दर्शन घेतले.भक्तीमय वातावरणात भाविकांनी श्री स्वामी समर्थ ची आरती करण्यात आली. संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने दरवर्षी स्वामी समर्थ महाराजांच्या पालखीचे व मूळ पादुकांचे विविध गावांमध्ये आगमन व परिक्रमा आयोजित केली जाते.यावेळी अक्कलकोट येथील स्वामी समर्थ महाराज संजय कुलकर्णी, श्री स्वामी समर्थ आशिष देसाई, उदय भास्कर सबनिस, उपस्थित होते.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५वा जयंती महोत्सव

**नवी मुंबई :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) कपिलवस्तु बुध्द विहार सेवा समिती, नेरूळ यांच्या विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५ वा जयंती महोत्सव शनिवारी १८ एप्रिल रोजी कपिलवस्तू बुध्दविहार, सेक्टर १०, नेरुळ, येथे नवी मुंबई महापौर सुजाता पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.


### नावात बदल

माझे जुने नाव **श्री. सुनिल शंकरराव गडलिंगे** राहणार श्रीकलश को.ऑप.हौ. सोसायटी प्लॉट नं १० सेक्टर १९, कामोठे पनवेल, रायगड महाराष्ट्र- ४१०२०६ हे माझे जुने नाव असून, मी **गॅझेट मध्ये फेब्रुवारी दि. २६/०२/२०२६ रोजी गॅझेट नं २५५०१९३६ प्रमाणे** श्री. सुनिल शंकराव गडलिंग असे बदलले असून, या पुढे मी **सुनिल शंकरराव गडलिंग** या नवीन नावाने ओळखला जाईल.

दि. १६/०४/२०२६
पनवेल

**सही/-**
**सुनिल शंकरराव गडलिंग**
नवीन नाव

### पनवेल महानगरपालिका, पनवेल

**जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०४/१२४/२६**
**महापालिका सचिव कार्यालय,**
**दिनांक :- १६/०४/२०२६**

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**

**प्रति,**
**श्री./श्रीमती...............................**
**मा.सदस्य/सदस्या,**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल.**

**महोदय/महोदया,**

**पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक २४/०४/२०२६ रोजी, सकाळी ११:०० वाजता, महापालिकेच्या "आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल" येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.**

**सर्वसाधारण सभा क्रमांक ०४. दिनांक २४/०४/२०२६ ची**

**विषयपत्रिका**

**विषय**

**१. मागील सर्वसाधारण सभा दिनांक ०१/०४/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.**

**२. प्रश्नोत्तरे**

**३. मा.आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :**

१. पनवेल महानगरपालिकेमार्फत राबविणेत येणारी जयंती उत्सव, साजरे करणेत येणारे सण व विविध कार्यक्रमानिमित्त' इमारती, रस्ते, चौक व स्मारक या ठिकाणी तीन वर्ष कालावधीकरीता भाडेतत्वावर आकर्षित विद्युत रोषणाई उपलब्ध करुन देणे.
२. पनवेल महानगरपालिका हद्दीतील नविन पनवेल (पूर्व) सेक्टर १, रोड नं. ४ येथे पावसाळी गटार बांधणे.
३. पनवेल महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती अ, ब, क व ड मध्ये अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निष्कासन करणेकामी मनुष्यबळ, यंत्रसामुग्री व वाहने पुरविणेकामी निविदा मागविणेबाबत.
४. पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध ठिकाणी वार्षिक दराने वृक्ष व रोपांचा पुरवठा, लागवड व संगोपन करणे.
५. पनवेल महानगरपालिका मालकीच्या बंदर रोड पनवेल येथील १४ द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया (STP) केंद्रातील इलेक्ट्रॉमेकॅनिकल व पंपीग मशीनरी तसेच इमारतीची दुरुस्ती करणे या कामाच्या प्रस्तावास व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
६. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. ०३, खारघर, सेक्टर ३६ मधील मुख्य रस्ता ते स्वप्नपुर्ती गृहसंकुल व व्हॅलीशिल्प पर्यंतच्या रस्त्याचे पुर्नपुष्टीकरण करणे. (डांबरीकरण करणे)
७. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती "अ" मधील विविध ठिकाणी दोन वर्षाकरिता पावसाळी पाण्याचा उपसा करण्यासाठी भाडेतत्वावर पंपाचा पुरवठा करुन परिचलन करणे या कामाचा प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
८. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती "ब" मधील विविध ठिकाणी दोन वर्षाकरिता पावसाळी पाण्याचा उपसा करण्यासाठी भाडेतत्वावर पंपाचा पुरवठा करुन परिचलन करणे या कामाचा प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
९. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती "क" मधील विविध ठिकाणी दोन वर्षाकरिता पावसाळी पाण्याचा उपसा करण्यासाठी भाडेतत्त्वावर पंपाचा पुरवठा करुन परिचलन करणे या कामाचा प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
१०. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती "ड" मधील विविध ठिकाणी दोन वर्षाकरिता पावसाळी पाण्याचा उपसा करण्यासाठी भाडेतत्वावर पंपाचा पुरवठा करुन परिचलन करणे या कामाचा प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
११. ना.प्र.आ.केंद्र नविन पनवेल येथील नविन ईमारतीमध्ये डायलिसिस सेंटर मधील रुग्णांसाठी मेडिकल गॅस पाईप लाईनचे काम करुन घेणेकरिता प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेकामी व ई - निविदा प्रसिध्द करणेकामी मान्यता मिळणेबाबत.
१२. ना.प्र.आ.केंद्र खारघर येथील नविन ईमारतीमध्ये डायलिसिस सेंटर मधील रुग्णांसाठी मेडिकल गॅस पाईप लाईनचे काम करुन घेणेकरिता प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेकामी व ई निविदा प्रसिध्द करणेकामी मान्यता मिळणेबाबत. -
१३. पनवेल महानगरपालिका मालकीच्या आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामधील मध्यवर्ती वातानुकुलित यंत्रणेची तीन वर्षाकरिता दैनंदिन परिचालन देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे

**(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)**

**महापालिका भवन, पनवेल**
**दिनांक :- १६/०४/२०२६**

**सही/-**
**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
**पनवेल महानगरपालिका**

### पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बांधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष / सचिव, कुसुम अनंत को ऑ. हौ. सोसायटी लि., प्लॉट नं.-१२, M.C.C.H सोसायटी पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | ०१ आंबा झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील **कुसुम अनंत को ऑ. हौ. सोसायटी लि.,प्लॉट नं. १२, M.C.C.H सोसायटी पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड** येथे भूखंडाच्या आवारातील **०१ झाडाला** वाळवी लागली असुन धोकादायक स्थितीत आहे. तसेच मेन गेटच्या मध्ये असल्यामुळे वाहने पार्किंग करणेस बाधित आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अर्धानियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२६/प्र.क्र. १०३/११३/२०२६**
**दिनांक :- १६/०४/२०२६**

**सही/-**
**उपायुक्त**
**तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**


### नंदकिशोर पाटील यांना हिंदू धर्मरक्षक पुरस्कार

**मोहोपाडा :** संत परिषदेकडून नंदकिशोर वायाळ पाटील यांना हिंदू धर्म रक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे .अखिल आर्यवत संघ आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे संस्थापक अध्यक्ष युवा हिंदुरुदय सम्राट दिनेश दादा पाटील मुंबई यांच्या हस्ते साधुसंतांच्या उपस्थितीमध्ये ५ में २०२६ रोजी गोंध येथे देण्यात येणार आहे.कार्यक्रमासाठीहाराष्ट्रातील नामांकित वारकरी कीर्तनकार उपस्थित राहणार आहेत .


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक १) **श्री. काशिनाथ सिताराम पवार, २) श्री. अजय माया पवार, ३) श्री. विजय माया पवार, ४) श्रीमती सरीता माया पवार** सर्व रा. मु. मोहोपे, पो. पोयंजे, ता. पनवेल, जि. रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन :**
**मौजे मोहोपे, ता. पनवेल, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकर (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| ३ | ९ | ०-२३-८०<br>पो.ख. ०-०४-५०<br>एकूण ०-२८-३० | ४.४४ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल
दिनांक : १६/०४/२०२६

**सही/-**
**निलेश द. हातमोडे**
ॲडव्होकेट हाय कोर्ट
मो. ८१०८५५८२८९

**ऑफिस पत्ता :** गाळा नं. १३०, पहिला मजला, म्युन्सिपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, भाजी मार्केटजवळ पनवेल. ४१० २०६ जि. रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-महोदर, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

**- मिळकतीचे वर्णन -**
**मौजे: महोदर, तालुका-पनवेल, जिल्हा- रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर. पॉ. | आकारणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| महोदर | १.महेन्द्रकुमार मिलापचंद कानुगो<br>२ महेश डुंगरमलजी चांडक<br>३ पारस मेघराज जैन<br>सर्व रा. अंबीका निवास, पहिला माळा,५वी खेतवाडी, लेन, मुंबई | १६५/३ | ०.३१.३०<br>०.०६.१०<br>०.३७.४० | ०.६९ |
| | | १४७/८/क | ०.६४.००<br>०.००.००<br>०.६४.०० | ७.६५ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १६/०४/२०२६**

**सही/-**
**ॲड. सरिता महेंन्द्र साखरे**
**पत्ता- बंन्सल असोसिएस, पहिला मझला प्लॉट नं.३०, सेक्टर १/२, रोड नं.४ नविन पनवेल, बालाजी मंदिरच्या समोर ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६**

### जाहीर नोटीस

याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, आमचे आशिल श्री. स्वप्नील भीमराव कांबळे राहणार अंबरनाथ ठाणे ४२१५०१ है खाली नमूद मालमत्तेबाबत व्यवहार (खरेदी विक्री/हक्क हस्तांतरण) करण्याच्या तयारीत आहेत.

**मालमत्तेचा तपशील खालीलप्रमाणे आहे**

| गाव | तालुका | जिल्हा | गट क्रमांक |
|---|---|---|---|
| शिवकर | पनवेल | रायगड | ७८/३ |
| भू-धारणा पद्धती : भोगवटादार वर्ग-१ | | | |

शेताचे स्थानिक नाव आवळे (जसे नोंद आहे)
सदर मालमता ही गाव नमुना ७/१२ उतार्यानुसार संबंधित धारकाच्या नावे नोंद आहे.
जान्या गोविंद टोपले.
गणा गोविंद टोपले.

वरील नमूद मालमतेबाबत कोणत्याही व्यक्ती, बैंक, वित्तीय संस्था, वारस, भाडेकरू किंवा इतर कोणत्याही व्यक्तीचा हक्क, दावा, तारण, चार्ज, गहाण, वाद किंवा कोणताही स्वारस्य हक्क असल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्या वकिलांकडे पुराव्यासह लेखी स्वरुपात कळवावे अन्यथा, वरील मालमता कोणत्याही बोजा/दाव्यापासून मुक्त असल्याचे गृहित धरून व्यवहार पूर्ण करण्यात येईल व नंतर येणारे कोणतेही दावे ग्राह्य धरले जाणार नाहीत.

**दिनांक: १७/०४/२६**
**ठिकाण : पनवेल**

**सही/-**
**ॲड. अविनाश गायकवाड**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
पत्ता :- शॉप न.०१, सिटीलाईट सीएचएस एलटीडी, प्लॉट नं. ५८/A, सेक्टर २१, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९, संपर्क : ९७६९११६३२२


# हजारो नागरिकांनी डॉ. आंबेडकर स्मारकात घेतली ज्ञानाची अनुभूती

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेचे सेक्टर १५, ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक 'ज्ञान हीच शक्ती' या संदेशाचा प्रत्यक्ष अविष्कार घडविणारे 'ज्ञानस्मारक' म्हणून नावाजले जात आहे. आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून नागरिकांनी महामानवाला अभिवादन करण्यासाठी याठिकाणी सकाळपासूनच मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी स्मारकास भेट देऊन विनम्र अभिवादन केले. महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, स्थायी समिती सभापती अशोक पाटील, सभागृह नेते सागर नाईक, माजी खासदार संजीव नाईक, माजी महापौर व नगरसेवक सुधाकर सोनावणे व इतर नगरसेवक, समिती सदस्य यांनीही स्मारकास भेट देत अभिवादन केले.

सध्या हवेत उष्मा मोठ्या प्रमाणात जाणवत असला तरी सायं. ६.३० वाजेपर्यंत आठ हजारहून अधिक नागरिकांनी स्मारकाला भेट दिली. सायंकाळी ४ नंतर नागरिकांनी कुटुंबियांसमवेत मुलाबाळांसह याठिकाणी भेट देण्यास पसंती दर्शविल्याचे



चित्र बघायला मिळाले व भेटी देणाऱ्यांचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढलेले दिसले. संध्याकाळनंतर वाढलेला नागरिकांचा ओघ रात्री उशीरापर्यंत सुरू राहील असे चित्र होते.

स्मारकाला भेट देणाऱ्या नागरिकांसाठी महानगरपालिकेच्या वतीने अल्पोपहार व चहापाणी व्यवस्था करण्यात आलेली होती. येथील उत्तम व्यवस्थेबद्दल नागरिकांनी महानगरपालिकेची प्रशंसा केली. नवी मुंबईतून ठिकठिकाणाहून निघणाऱ्या मिरवणूका, रॅली यांनीही स्मारकाला भेट देऊन अभिवादन करून पुढे जाण्यास पसंती दर्शविली.

बाबासाहेबांच्या जयंतीचे औचित्य साधून ३ एप्रिल ते १३ एप्रिल या कालावधीत राबविण्यात आलेली 'जागर' ही विशेष व्याख्यानमाला नागरिकांच्या अतिशय उत्साही प्रतिसादामुळे यशस्वी झाली. सुप्रसिध्द अभिनेते सयाजी शिंदे तसेच किशोर कदम तथा कवी सौमित्र, संपादक-लेखक श्रीकांत बोजेवार, लोकशाहीर संभाजी भगत, सामाजिक कार्यकर्त्या ॲड.वर्षा देशपांडे, सुप्रसिध्द गायिका रसिका व कृतिका या बोरकर सिस्टर्स तसेच डॉ.रेवत कानिंदे, दीपा पवार, सोमनाथ वाघिरे, छाया काविरे या विविध क्षेत्रात कर्तबगारी गाजविणाऱ्या युवा व्याख्यात्यांच्या 'भिमा तुझ्या जन्मामुळे' अशा सर्वच व्याख्यान, सुसंवाद कार्यक्रमांना रसिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. नागरिकांची वाढती गर्दी पाहून सभागृहाबाहेर एलईडी स्क्रिन लावून व्याख्याने थेट प्रक्षेपित करावी लागली हा सध्याच्या काळातील व्याख्यानांना होणाऱ्या गर्दीचा अनुभव या व्याख्यानमालेतून आला.

अत्याधुनिक ई-लायब्ररीने सुसज्ज ग्रंथालयांप्रमाणेच बाबासाहेबांचे जीवनचरित्र दुर्मीळ छायाचित्रांतून साकारणारे छायाचित्र दालन हे स्मारकाचे खास आकर्षण असून त्यामधून अनेकांना प्रेरणा मिळत असल्याचे अभिप्राय नागरिकांकडून दिले जातात. आभासी चलचित्र प्रणालीद्वारे बाबासाहेबांचे प्रत्यक्ष भाषण ऐकण्याची संधी देणारा अत्याधुनिक होलोग्रफिक प्रेझेंटेशन शो उपस्थितांना भारावून टाकतो. याशिवाय एकाच वेळी २०० व्यक्ती ध्यान करू शकतील असे भव्य ध्यानकेंद्र एक वेगळी अनुभूती देते.

# विद्यार्थ्यांना जलतरण क्रीडा प्रकारात प्रगत प्रशिक्षण



**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना ऑलिम्पिक स्तरावर खेळल्या जाणाऱ्या 'जलतरण' या क्रीडा प्रकारात आपले कौशल्य सिद्ध करुन प्राविण्य मिळविण्यासाठी तंत्रशुद्ध प्रशिक्षण देण्याचे काम महापालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाकडून करण्यात येत आहे.

याकरिता घणसोली सेंट्रल पार्क येथील जलतरण तलावावर नमुंमपा शाळा क्रमांक ४२, घणसोली येथील मुलामुलींची प्राथमिक स्तरावर दि. १० व ११ एप्रिल, २०२६ रोजी निवड चाचणी घेण्यात आली. यामध्ये ११० मुले व ६२ मुलींनी सहभाग घेतला. याकरिता क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव यांनी पुढाकार घेऊन शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना म्हात्रे यांचेशी समन्वय साधला व प्रशिक्षणाबाबत चर्चा केली. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी सहशिक्षक संतोष मुंढे, राजेश पाडळे, स्मिता पुकळे व अदिती काळे यांनी साधारणपणे पोहता येते अशा इच्छुक मुलामुलींना मनापासून प्रोत्साहित करीत क्रीडा विभागाशी समन्वय साधून निवड चाचणी घेण्यासाठी उत्तम सहकार्य केले.

या प्राथमिक निवड चाचणी मधून २१ मुले व ६ मुलींची अंतिम निवड करण्यात आली असून आता पुढील टप्प्यात प्रगत प्रशिक्षण देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

यामधून आगामी काळात सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत इतर खासगी शाळांमधील जलतरणपटूंसोबत नवी मुंबई महानगरपालिका शाळांतील विद्यार्थी जलतरणपटू स्पर्धांमध्ये सहभागी होऊन नवी मुंबई महानगरपालिकेचा नावलौकिक उंचावतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# नवी मुंबई विमानतळ परिसरात साकारणार शासकीय अतिथीगृह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पहिला टप्पा यशस्वीरीत्या सुरू होऊन चार महिने पूर्ण होत असतानाच, राज्य सरकारने आता या विमानतळ परिसरात व्हीव्हीआयपी व्यक्तींसाठी भव्य शासकीय अतिथीगृह उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

मुंबई विमानतळाजवळील नंदगिरी अतिथीगृहाच्या धर्तीवर नवी मुंबईतही राजशिष्टाचार विभागाचा विशेष नियंत्रण कक्ष आणि निवास व्यवस्था असावी, या उद्देशाने सिडकोच्या माध्यमातून ही प्रक्रिया राबवली जात आहे. यासाठी विमानतळाला लागूनच असलेल्या पुष्पक नगर येथील पारगाव भागात अडीच एकर जागा राखीव ठेवण्याचा निर्णय सिडको प्रशासनाने घेतला असून यामुळे विमानतळ परिसरातील पायाभूत सुविधांना अधिक बळकटी मिळणार आहे.

२५ डिसेंबर २०२५ रोजी या विमानतळाचा पहिला टप्पा सुरू झाल्यापासून गेल्या चार महिन्यांत येथून मोठ्या प्रमाणावर आंतरदेशीय उड्डाणे झाली आहेत. आगामी महिनाभरात आंतरराष्ट्रीय विमान सेवा सुरू करण्याचे नियोजन असल्याने विमानतळावर राजशिष्टाचार विभागाची स्वतंत्र व्यवस्था असणे अनिवार्य झाले आहे.





**पनवेल : भारतीय जनता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक जनरल कामगार युनियनच्या रायगड जिल्हा स्तरावरील संघटनात्मक नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून यामध्ये दत्तात्रय मादगुडे यांची रायगड जिल्हा सचिवपदी, तर सदाशिव भिसे यांची रायगड जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना गुरुवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संघटनेच्या माध्यमातून कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजप कामगार मोर्चा प्रदेश सचिव संजय भगत, उपाध्यक्ष अनिल खोपडे, किशोर कृष्णा देवघरे आदी उपस्थित होते.**

# 'आउसी गोस्ट' लघुकथासंग्रह प्रकाशन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

एन.आर. भगत स्कुल, नेरूळ, सेक्टर १२ येथील सभागृहात रंगधनु प्रकाशित गजआनन म्हात्रे लिखित 'आउसी गोस्ट' या लघुकथा संग्रहाचे प्रकाशन प्रसिद्ध साहित्यिक डॉ. बाळासाहेब लबडे-रत्नागिरी यांच्या हस्ते झाले.

प्रा.दुर्गा देशमुख यांनी स्वागतगीत म्हटले. व्यासपीठावरील डॉ. बाळासाहेब लबडे, नामदेवजी भगत, कौमुदी गोडबोले, प्रा. प्रतिभा सराफ, लेखक गजआनन म्हात्रे यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. नवरंगचे कार्यवाह घनश्याम परकाले यांनी नवरंग मंडळ वाटचालीचा आढावा घेतला. नवरंगचे सल्लागार प्रा. अजित मगदुम यांनी म्हात्रे यांच्या लेखन कार्याचा गौरव करून शुभेच्छा दिल्या.

नवरंगचे अध्यक्ष आणि रंगधनु प्रकाशनचे मालक गज आनन म्हात्रे यांनी आपल्या पुस्तक प्रवासाचा आढावा घेऊन पुढील संकल्प सांगितला. प्रा प्रतिभा सराफ यांनी 'आउसी गोस्ट' या आगरी बोलीतील कथांचे वैशिष्ट्ये सांगून



बोलीभाषा अभिजात मराठी भाषेसाठी पुरक असल्याचे सांगितले. नेते नामदेवजी भगत यांनी आपण शाळा कशी उभारली? याची गोष्ट सांगितली. लेखिका कौमुदी गोडबोले यांनी 'आउसी गोस्ट' कथांचे विश्लेषण करून त्यातील साहित्य सत्वाचा परामर्श घेतला.

सोहळ्याचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब लबडे यांनी बोलीभाषा आणि ज्ञानेश्वरीतील संदर्भ सांगून, विविधांगी लिखाण केल्याबद्दल म्हात्रे यांचे कौतुक केले. प्रा.चंद्रकांत मढवी यांनी लेखक गज आनन म्हात्रे यांचा यथोचित सत्कार करून शुभेच्छा दिल्या. नवरंग मंडळ सदस्य प्रा. दुर्गा देशमुख यांनी सर्वांचे आभार मानले. सूत्रसंचालन सुचल जाधव यांनी केले. मान्यवरात जेष्ठ नागरिक संघ अध्यक्ष विकास साठे, अरविंद वाळवेकर, माढेकर, डॉ. अविनाश पाटील, लेखक गजानन परब, कथाकार रूपाली लटके, व्यसनमुक्तीचे दिलीप आमले, कुसुमाग्रज ग्रंथालयाचे ललित पाठक, महादेव देवळे, गायकवाड दाम्पत्य, साहित्य रसिक नितिन पवार, नवदुर्गा पवार, कवी कृष्णकांत सपकाळ, लेखक/कवी उत्तमराव तरकसे आदी उपस्थित होते.

नेमके आयोजन, सकस भाषणे यांनी यांनी कार्यक्रमाची उंची वाढली, सर्व नवरंग मंडळ सदस्यांनी मोलाचे सहकार्य दिले.

# वाशी गावात सुगंधी अंगण अभियानाचा शुभारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छतेच्या बाबतीत देशात आणि राज्यात अग्रस्थानी राहिलेल्या नवी मुंबई शहराने आज 'सुगंधी शहर' बनविण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. नवी मुंबईचे उपमहापौर दशरथ भगत यांच्या संकल्पनेतून आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने "सुगंधी अंगण अभियान - सुंदर माझे अंगण, सुगंधी माझे शहर" या अभिनव मोहिमेचा शानदार शुभारंभ वाशीगाव येथे करण्यात आला.

विशेष म्हणजे, वाशीगावच्या पारंपरिक गावदेवी जत्रोत्सव पालखी सोहळ्याचे औचित्य साधून या लोकचळवळीला सुरुवात करण्यात आली. जत्रोत्सवाच्या सांस्कृतिक वारशाला 'स्वयंदेखरेख दत्तक संकल्प' आणि 'सामाजिक भान' याची जोड देण्याचा यशस्वी प्रयत्न या निमित्ताने दिसून आला.

या सोहळ्याला नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत आणि



नमुंमपा सभागृह नेते सागर नाईक यांची प्रमुख उपस्थिती लाभली. माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांच्या वाढदिवसाच्या निम्मिताने मान्यवरांच्या हस्ते सोसायट्यामधील रहिवासीयांना सुगंधी फुलांच्या झाडांचे वाटप करून या मोहिमेला अधिकृतरीत्या सुरुवात करण्यात आली. नमुंमपाचे नगरसेवक निशांत करसन भगत यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते, तर नगरसेविका प्रिती संदीप भगत कार्यक्रमाच्या निमंत्रक होत्या.

"सुगंधी अंगण" या उपक्रमाद्वारे लोकसहभागातून नवी मुंबई स्वच्छतेसोबतच 'सुगंधी' होऊन 'स्वच्छ भारत लीग' स्पर्धेत राज्यसह देशात अनुकरणीय होईल, असं महापालिका अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार म्हणाले. हे अभियान सर्वव्यापी करण्यासाठी महापालिका प्रशासन कटीबद्ध राहील आणि या अनोख्या 'सुगंधी अंगण अभियाना'ची ओळख सर्वदूर पसरेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

> **संपूर्ण शहरात हे अभियान राबविण्यासाठी पुढाकार घेणार असून वाशी गाव त्याचप्रमाणे गावठाण क्षेत्रातील रस्त्यांचे व लहान मार्गीकांचे डक्टसहित काँक्रिटीकरण केल्यामुळे यापुढे महानगरपालिकेच्या करोडो रुपयांची बचत होणार आहे.**
> **-सुजाता पाटील,**
> महापौर, नवी मुंबई

### लोकचळवळीतून शहराचा कायापालट

या मोहिमेंतर्गत नागरिकांनी आपल्या घरासमोरील अंगण आणि इमारतीचा आवार स्वच्छ ठेवण्यासोबतच, परिसरातील सार्वजनिक जागा (फुटपाथ, चौक, वाचनालय किंवा बस स्टॉप) 'दत्तक' घेऊन तिथे सुगंधी फुलांच्या झाडांची लागवड व संगोपन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# महात्मा फुले, डॉ. आंबेडकर संयुक्त जयंती

**नवी मुंबई : बातमीदार**

श्रमिक शिक्षण मंडळाचे कोपरखैरणे येथील एफ. जी. नाईक महाविद्यालयात १३ एप्रिल रोजी थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमात प्रमुख अतिथी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमांतर्गत थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार व पुष्पांजली वाहून विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना प्राचार्य प्रताप महाडिक यांनी महात्मा फुले यांचे विचार फक्त आत्मसात करून चालणार नाहीत तर ते प्रत्यक्ष अमलात



आणण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत आणि त्यांना अभिप्रेत असलेला समाज घडविला पाहिजे असे सरांनी आवर्जून उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांना सांगितले. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी बोलत असताना त्यांनी आवर्जून सांगितले की, बाबासाहेब केवळ शिक्षण घेऊन थांबले नाहीत तर त्यांनी त्यांच्या शिक्षणाचा समाजाला आणि देशाला कसा फायदा होईल याचा विचार केला.

बाबासाहेबांचे कार्य केवळ एका समाजापुरते मर्यादित नव्हते. भारतासारख्या अफाट विविधता असलेल्या देशाला एका सूत्रात बांधण्याचे काम त्यांनी 'भारतीय संविधाना'च्या माध्यमातून केले. आजही आपला देश याच कायद्याच्या बळावर यशस्वी लोकशाही म्हणून जगात उभा आहे.

यामधून प्रेरणा घेऊन खऱ्या अर्थाने थोर समाज सुधारकांना अभिवादन करायचे असेल, तर त्यांनी दिलेला 'वाचाल तर वाचाल' हा विचार अंगीकारणे गरजेचे आहे. आपण अंधश्रद्धा आणि द्वेष सोडून वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासला पाहिजे असे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे समन्वयक डॉक्टर दत्ता घोडके सर, स्टाफ सेक्रेटरी प्राजक्ता सावंत, प्रा. शरद जगताप व प्रा. प्रमोद साळुंखे यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका सीमा शिंदे यांनी केले तर उपस्थितांनचे आभार प्रा. प्रमोद साळुंखे यांनी मानले हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एक विचारधारा -प्रियांका डोके

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जवाहरलाल नेहरू पतन प्राधिकरण आणि एससी, एसटी एम्प्लॉईज वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती महोत्सवाचे आयोजन १४ एप्रिल रोजी करण्यात आले होते.

यावेळी एडवोकेट, प्रोफेसर प्रियांका डोके-मंडलिक (एचओडी ऑफ डॉ. डी वाय पाटील कॉलेज ऑफ लॉ नेरूळ) यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एक व्यक्तिमत्व नसून एक विचारधारा आहे. जर डॉ. बाबासाहेब आज जिवंत असते तर त्यांनी सर्वप्रथम समाजातील



वाढती असमानता, जातीय भेदभाव आणि सामाजिक अन्याय याविरुद्ध कडक आवाज उठवला असता आणि आपल्याला त्यांनी आठवण करून दिली असती की संविधान फक्त पुस्तकात नाही तर ते आपल्या वागण्यात आणि विचारात दिसले पाहिजे.

शिक्षणाने माणूस विचारशील, स्वाभिमानी आणि जबाबदार बनला पाहिजे तसेच चुकीच्या माहितीविरुद्ध त्यांनी जनजागृती केली असती असे सांगितले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एक व्यक्तिमत्व नसून एक विचारधारा आहे. बाबासाहेबांच्या विचारांचे पालन करूनच आपण खऱ्या अर्थाने समाज आणि न्याय समाज निर्माण करू शकतो असे प्रियंका डोके यांनी सांगितले.

# थेरोंडा खंडेरावपाडा येथे मटका जुगारावर धाड

## रेवदंडा पोलिसांची कारवाई; एकावर गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या थेरोंडा खंडेरावपाडा, पो. चौल, ता. अलिबाग येथे मटका जुगार चालवणाऱ्या एका व्यक्तीवर पोलिसांनी कारवाई करून गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई ८ एप्रिल २०२६ रोजी रात्री सुमारे ७.४० वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महेंद्र एकनाथ माहीमकर (वय ६२, रा. थेरोंडा खंडेरावपाडा, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड) हा आपल्या घराच्या मागील नारळ-सुपारीच्या वाडीत मोकळ्या जागेत लोकांकडून पैसे स्वीकारून चिठ्ठ्यांवर आकडे लिहून 'कल्याण मेन' नावाचा मटका जुगाराचा धंदा बेकायदेशीररित्या चालवत असल्याचे आढळून आले. या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारवाईदरम्यान पोलिसांनी आरोपीकडून ६०० रुपये रोख रक्कम, त्यामध्ये ५०० रुपयांची एक नोट व १०० रुपयांची एक नोट, तसेच OX HAUSER कंपनीचा निळ्या शाईचा पेन जप्त केला आहे. आकडेमोडीशी संबंधित साहित्यही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

या प्रकरणी फिर्याद सिद्धेश सुभाष शिंदे (वय ३२), पोलीस कर्मचारी, रेवदंडा पोलीस ठाणे यांनी दिली आहे. ही कारवाई सपोनि बी. के. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून पुढील तपास पोलीस हवालदार आर. के. थळे करीत आहेत.

## बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात पर्यटन हंगाम सुरू असल्याने मोठ्या संख्येने पर्यटक दाखल होत आहेत. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बुधवारी (दि.१५) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ४५७ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून चार लाख ७९ हजार ५०० रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

## क्रीडा संकुलाला बेकायदा नळजोडण्यांचा फटका



### माजी आमदार पंडित पाटील यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याची शान आणि अलिबागची ओळख असलेल्या नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या दुरवस्थेबाबत माजी आमदार भाजप नेते पंडित पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून प्रशासकीय अनास्थेवर जोरदार ताशेरे ओढले आहेत.

पंडित पाटील यांनी पत्रात आणि चर्चेत एका गंभीर मुद्द्याकडे लक्ष वेधले आहे. जिल्हा क्रीडांगणाला पाणीपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र एमआयडीसीची पाईपलाईन टाकण्यात आली होती, ज्याचे उद्घाटन स्वतः मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले होते, मात्र मध्यंतरीच्या काळात स्थानिक ग्रामपंचायतीने या वाहिनीवर बेकायदेशीर नळजोडण्या घेतल्यामुळे क्रीडांगणाला होणारा पाणीपुरवठा खंडित झाला आहे. परिणामी, कोट्यवधी रुपये खर्चून तयार केलेले मैदान पाण्याच्या अभावामुळे खराब होत आहे.

वसतिगृहाचा वापर केवळ कोविड आणि निवडणुकांसाठीच? क्रीडा संकुलाच्या आवारात १२० विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत वसतिगृह उभारण्यात आले आहे, मात्र या वसतिगृहाचा वापर खेळाडूंसाठी होण्याऐवजी केवळ कोविड सेंटर आणि निवडणूक कामांसाठी केला जात असल्याचा आरोप पाटील यांनी केला आहे. "येथे कोणत्याही मोठ्या क्रीडा स्पर्धा घेतल्या जात नाहीत, मग राज्य आणि केंद्र सरकारचा खेळाडू घडवण्याचा उद्देश कसा साध्य होणार?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

**सीएसआर निधीतून अद्ययावत करण्याची मागणी**

अलिबाग तालुक्यात आरसीएफ आणि गेल सारख्या मोठ्या कंपन्या कार्यरत आहेत. जर राज्य सरकारकडे क्रीडांगणाच्या देखभालीसाठी निधी नसेल, तर या कंपन्यांच्या सीएसआर फंडातून हे क्रीडा संकुल अद्ययावत करावे, अशी सूचनाही त्यांनी केली आहे.

**पंडित पाटील यांच्या प्रमुख मागण्या**

मतमोजणीसाठी स्वतंत्र केंद्रः क्रीडांगणाचा वापर निवडणुकांसाठी केल्यामुळे खेळाडूंच्या सरावात व्यत्यय येतो, त्यामुळे निवडणूक कामांसाठी अलिबागमध्ये स्वतंत्र कायमस्वरूपी कार्यालय किंवा केंद्र उभारावे.

बेकायदा नळजोडण्यांवर कारवाईः एमआयडीसीच्या वाहिनीवरील बेकायदा कनेक्शन तोडून क्रीडांगणाचा पाणीपुरवठा पूर्ववत करावा.

निधीचे समान वाटपः नवीन क्रीडांगणांच्या घोषणा करण्याऐवजी अस्तित्वात असलेल्या नेहुली आणि तळा येथील क्रीडा संकुलांच्या देखभालीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा.

"ऑलिम्पिकमध्ये आपले खेळाडू जावे असे वाटत असेल, तर उपलब्ध मैदाने सुस्थितीत असणे ही काळाची गरज आहे," असे स्पष्ट मत पंडित पाटील यांनी व्यक्त केले आहे. आता मुख्यमंत्री यावर काय दखल घेतात, याकडे रायगडच्या क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

## डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने राज्यभरात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये विचारप्रवर्तक लेखनाची आवड निर्माण करणे तसेच डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याची माहिती कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांसाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या कार्याचा व्यापक आवाका लक्षात घेता "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य" या विषयावर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

स्पर्धा दोन गटांत होणार असून पहिल्या गटात शासकीय व खाजगी आयटीआय तसेच आयटीआय उत्तीर्ण विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. या गटासाठी निबंधाची शब्दमर्यादा ५०० ते ८०० अशी आहे. दुसरा गट खुला असून राज्यातील सर्व महिला व पुरुष सहभागी होऊ शकतात. या गटासाठी ८०० ते १२०० शब्दांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. दोन्ही गटांसाठी निबंध केवळ मराठी भाषेत सादर करणे बंधनकारक आहे. स्पर्धेचा कालावधी १४ ते २० एप्रिल २०२६ असा आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी ९१५२२३०१९३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच नोंदणीसाठी क्यूआर कोडची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून नोंदणी केल्यानंतर स्पर्धकांना त्याची पोचही दिली जाणार आहे.

या स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, संविधानिक मूल्ये आणि नेतृत्वगुण विकसित करण्यावर भर दिला जात आहे. उत्कृष्ट निबंधांना पारितोषिके देण्यात येणार असून सर्व सहभागी स्पर्धकांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात येणार आहे. तरी अधिकाधिक उमेदवारांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र श्रीमती अ. मु. पवार यांनी केले आहे.

## चौक येथे गावदेवीचा वार्षिक उत्सव उत्साहात साजरा

**चौक : प्रतिनिधी**

चौक गावची ग्रामदैवत आई गावदेवी चा वार्षिक चैत्र महिन्यातील उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

संपूर्ण चौक गावची ग्रामदैवत आई गावदेवी देवीचा वार्षिक उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, गावदेवी माता ही पाषाण रुपी स्वयंभू आहे. वार्षिक उत्सव निमित्ताने रुपाची स्थापना करून देवीला सजविण्यात आले होते, संपूर्ण दिवस विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते, सायंकाळी सत्यनारायण पूजा करण्यात आल्यावर आई गावदेवी ची पालखी रथातून पूर्ण चौक गावातून मिरवणूक काढण्यात आली होती.



चौक गावातील महिलांनी ओटी भरून मनोभावे पूजा केली. मिरवणुकीला महिला,पुरुष, लहान मुले यांनी सहभाग घेतला. दुसऱ्या दिवशी मानपान करून उत्सवाची सांगता केली. यावेळी चौक गावातील तरुण, जेष्ठ नागरिक व महिला यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.



**खोपोली : दिव्यांग्याच्या मानधनात ७५० रुपयांवरून १२०० रुपये वाढ केल्याच्या पार्श्वभूमीवर दिव्यांग क्रांती संघटनेतर्फे खोपोली नगरपालिकेचे आभार मानण्यात आले. या संबंधीचे पत्र उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांना संघटनेतर्फे देण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष भाजपचे सूर्यकांत देशमुख, शिवसेनेचे संदीप पाटील, देशमुख व संघटनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.** (छाया : जयवंत माडपे)

## डिकसळ येथील शिबिरात ४८ जणांनी केले रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त शांतीदूत मंडळ, माता रमाबाई महिला मंडळ, शांतीनगर डिकसळ येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ४८ जणांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले हे ५३८ वे रक्तदान शिबीर होते.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन शांतीदूत मंडळाचे अध्यक्ष नितीन गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

या रक्तदान शिबिराला नगराध्यक्षा पुष्पा दगडे, ॲड. रंजनाताई धुळे, जिल्हा परिषद सदस्य सुवर्णा ठाकरे, कर्जत पंचायत समिती सदस्य नमिता श्रीखंडे, लहु श्रीखंडे, प्रशिक गायकवाड, निखिल गायकवाड, प्रणव गायकवाड, अविनाश चव्हाण, सौरभ वाघमारे, यश गायकवाड, आशुतोष सोनावणे, आयुष दिवाकर आदींनी भेट दिली.



## प्रवीण काकडे यांना पुरस्कार




**चौक : प्रतिनिधी**

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल आदिवासी धनगर समाज साहित्य संमेलनात श्रीमंत महाराजा यशवंतराव होळकर समाजसेवा पुरस्कार देऊन समाजसेवक प्रवीण काकडे यांना देऊन गौरविण्यात आले, त्यांना खासदार रामराव वडकुते आणि आमदार गोपीचंद पडळकर यांच्या हस्ते देण्यात आला,

आदिवासी धनगर समाजाचे साहित्य संमेलन नाशिक येथे नुकतेच पार पडले. येथे संस्थापक अध्यक्ष अहिल्यादेवी सामाजिक व शैक्षणिक विकास ट्रस्ट कराड व ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण काकडे यांना सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराजा यशवंतराव होळकर समाजसेवा राज्यस्तरीय पुरस्कार नाशिक येथे देऊन सन्मानित करण्यात आले.

गेल्या कित्येक वर्षांपासून प्रवीण काकडे हे शैक्षणिक चळवळीला महत्त्व देण्यासाठी गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करत आहेत आता पर्यंत ५००० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप डोंगर दऱ्या-खोऱ्यातील जंगलातील दुर्गम भागातील महिलांना साडी वाटप, सॅनिटरी पॅड वाटप करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

## रोहा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**रोहा : प्रतिनिधी**

बौद्ध समाज युवा संघ रायगड, यंग युनिटी वेल्फेअर असोसिएशन, आदिवासी ठाकूर सामाजिक उन्नती संस्था रोहा व आदिम जमात कातकरी समाज संघटना रोहा, यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्सवानिमित्त रोहा शासकीय विश्रामगृह येथे रक्तदान शिबिर व मोफत आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्घाटन झाले. यावेळी राजिप उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी डॉ. पुजा भट, डॉ. फरीद चिमावकर, डॉ. रिया अहीरे, डॉ. हेत मामानिया, पत्रकार धम्मशील सावंत, राम नाकती, अनिल आष्टीकर, संस्थापक रमेश शिंदे, अध्यक्ष जितेंद्र गायकवाड, शशीकांत कोळी, सुप्रिया मोरे, चंदादेवी तिवारी, सुविनय अहीरे, विशाल सुरलकर, राजेंद्र जाधव, प्रथमेश कांबळे, दिपक दाभाडे, गजानन जांबुळघरे, अरुणकुमार भारती, रोहीत शिंदे, प्रताप खंडारे, अमोल वाटवे, इंगळे आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. पुजा भाट यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणजे ज्ञानाची तलवार, विचारांची धार असल्याचे उदाहरण देऊन सांगितले.धम्माशील सावंत यांनी जाती भेद ला छेद देण्याचे काम महाराष्ट्रात संतांनी केले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी समान मुल्य ठेवत कोणत्या एका समाजासाठी काम केले नाही तर सर्व समाजासाठी सामाजिक समतेचे काम केले आहे.



## गोरेगाव कुंभार आळीतील श्रीकृष्ण मंदिराचा जीर्णोध्दार व कलश पूजन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील गोरेगाव कुंभारआळी येथील श्रीकृष्ण मंदिराचा जिर्णोध्दार सोहळा व कलश पूजन कार्यक्रम व उद्‌घाटन सोहळा १४ एप्रिल २०२६ रोजी कोकण स्थानिक स्वराज्य संस्थेचे माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. यावेळी मार्गदर्शन करताना अनिकेत तटकरे यांनी मंदिराच्या या वास्तूतून निश्चितच चांगले विचार घडविले जातील असा विश्वास व्यक्त केला.



गोरेगाव कुंभारआळी येथील श्रीकृष्ण मंदिराचा जिर्णोध्दार सोहळा व कलश पूजन कार्यक्रमाचे सलग तीन दिवस आयोजन करण्यात आले आहे. मंदिराच्या या सोहळयानिमित्त सोमवार दि.१३ एप्रिल रोजी सकाळी ७:३० वा. कलश पूजन आणि होम,रात्री ९ वा. ह.भ.प.किरण कुंभार महाराज यांचे कीर्तन, मंगळवार दि.१४ एप्रिल रोजी सकाळी ११ वा.मंदिराचा उदघाटन,महाप्रसाद आणि सांस्कृतिक कार्यक्रम, बुधवार १५ एप्रिल रोजी गोरोबाकाका पुण्यतिथी सोहळा, महाप्रसाद दुपारी १ ते ४ वा. रात्री ९ :३० वा. श्री. डांगे सर यांचे भजन असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या मंदिराचा उदघाटन सोहळा मंगळवारी माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते झाला.

या कार्यक्रमास गोरेगाव सरपंच जुबेर अब्बासी,जेष्ठनेते दिलीप शेट,भूपेंद्र शेट,माजी सभापती अरुणा शेट,उपसरपंच चंद्रकांत गोरेगावकर,गोरेगाव कुंभारआळी समाज अध्यक्ष सुभाष बामणोलकर, उपाध्यक्ष सुनील म्हशेलकर,माजी उपसरपंच दिनेश उचाटे,विनोद बागडे,ग्रामपंचायत सदस्य रोहित शिंदे,रमेश गोविलकर,नथुराम बामणोलकर,महिला मंडळ सेक्रेटरी रुपाली रातवडकर, उपाध्यक्ष नम्रता बामणोलकर, नवतरुण मंडळ अध्यक्ष मयूर बामणोलकर, उपाध्यक्ष साहिल म्हशेलकर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन रोहित रातवडकर यांनी केले.

## कर्जतमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अनेक मान्यवरांनी तसेच बहुजन वर्ग व आंबेडकरी अनुयायांनी आपले उध्दारकर्ते व घटनेच्या माध्यमातून हजारो अधिकार बहाल करणारे घटनाकार यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे उपस्थिती दर्शवून त्यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच शहरातून तसेच ग्रामीण भागतही मिरवणूका काढण्यात आल्या.

गुंडगे, पंचशील नगर, संत श्री रोहिदास नगर, जुने एस टी स्टँड परिसर, विजय मित्र मंडळ, रेल्वे घाट बंगला, भिसेगाव, मुद्रे, नाना मास्तर नगर, दहिवली, आकुर्ले, कर्जत शहर आदी परिसरातील बहुजन वर्ग, बौद्ध समाज, महिला, तरुण-तरुणी, बच्चे कंपनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयघोषात, डी जे च्या तालावर तरुणाई नाचत, निळे झेंडे फिरवत कर्जत शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी गेली अनेक वर्षांपासून विजय मित्र मंडळ घाट बंगलाचे अध्यक्ष राहुल सोनावणे यांच्या नेतृत्वाखाली व मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली डी.जे. सिस्टिमची व्यवस्था करून भव्य मिरवणुकीत सर्व गुंडगे वासिय महिला वर्ग व तरुणाई सामील होतात. यावेळी राहुल सूर्यवंशी या सामाजिक कार्यकर्ते व परिवाराने सर्व बौद्ध बांधव व महिला भगिनीस मोफत ऊसाच्या ताज्या रसाचे वाटप केले, तर मानव बहुउद्देशीय सेवा संस्थेच्या अध्यक्षा सविता जगताप, कांचन धारगावे, ईश्वर भालेराव यांनी मोफत थंड ताक, पाणी व नास्ता, लाडूचे वाटप केले. तसेच कर्जत नगर परिषदेच्या वतीने थंड ज्यूस वाटण्यात आले.

सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील पवार यांनी थंड पेया च्या बाटल्या वाटल्या. मुस्लिम समाज बांधवांनीदेखील थंड ज्यूस वाटले. जुने एसटी स्टँड येथे जयंतीचे अध्यक्ष सुनील चव्हाण यांनी कांदे पोहे व कलिंगड ज्यूस सर्वांना दिला.

या मिरवणुकीत स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष उत्तम भाई जाधव, शहराध्यक्ष सुभाष सोनावणे, संघटक तुषार बनसोडे, उपाध्यक्ष चंद्रकांत धनवटे, अनिल जाधव, माजी उपनगराध्यक्ष उमेश गायकवाड, आरपीआयचे शहर अध्यक्ष अरविंद मोरे, महिला शहर अध्यक्षा वैशाली भोसले, महेश भोसले, माजी नगरसेवक दिपक मोरे, वैशाली मोरे, आझाद समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष सचिन भालेराव , भीम गर्जना मित्र मंडळ कर्जत बौद्ध नगरचे अध्यक्ष योगेश गायकवाड, बीएसपीचे शहराध्यक्ष सचिन चव्हाण, मंगेश गायकवाड, तानाजी सोनावणे तसेच भारतीय बौद्ध महासभेचे व सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी संध्याकाळी कर्जत बौद्ध नगर येथील राहुल युवक मंडळचे आधारस्तंभ व जयंतीचे अध्यक्ष माजी उपनगराध्यक्ष राहुल डाळींबकर यांच्या नेतृत्वाखाली सतिश देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली व मंडळाचे अध्यक्ष सिद्धांत डाळींबकर आदींनी रहिवासी, नागरिकांनी डी जे च्या तालावर, ढोल ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक बाजारपेठेतून निघाली तसेच गुंडगे प्रभागातदेखील भव्य मिरवणूक काढण्यात आली. यांत सर्वांचा उत्साह जोरदार होता तर महिला व तरुणाईची उपस्थिती मोठ्या प्रमाणात दिसून आली. सर्वांनी एकत्रित जमून भीम जयंतीचा आनंदोत्सव साजरा केला.

# आरसीबीचा लखनऊवर दमदार विजय

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

रसीख सलाम दार आणि भुवनेश्वर कुमारच्या भेदक माऱ्यानंतर विराट कोहलीच्या इम्पॅक्टफुल खेळीच्या जोरावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघाने लखनऊ सुपर जायंट्सला एकतर्फी मात दिली. बंगळुरुच्या संघाने घरच्या मैदानातील या विजयासह गुणतालिकेत अव्वलस्थानी झेप घेतली आहे.

नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजीचा निर्णय घेतल्यावर बंगळुरूच्या संघाने लखनऊला १४६ धावांत ऑलआउट केले. या अल्प धावसंख्येचा पाठलाग करताना बंगळुरूच्या संघाने पाच विकेट्स राखून फक्त ९१ चेंडूत सामना खिशात घातला.

आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदार याने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. रसीख सलाम दार (चार विकेट्स), भुवनेश्वर कुमार (तीन विकेट्स), जोश हेजलवूड (एक विकेट) या जलगदती गोलंदाजांसह क्रुणाल पांड्याने (दोन विकेट्स) आपल्या फिरकीतील जादू दाखवून देत तगडी बॅटिंग लाईन अप असलेल्या लखनऊच्या संघाला अवघ्या १४६ धावांत ऑलउट केले. लखनऊकडून मिचेल मार्शने ३२ चेंडूत केलेल्या ४० धावांशिवाय आयुष बडोनी ३८(२४) आणि मुकुल चौधरी ३८(२८) धावांची खेळी केली.



या अल्प धावसंख्येचा पाठलाग करताना बंगळुरूचा फिल सॉल्ट अवघ्या सात धावांवर परतला. देवदत्त पडिक्कल हादेखील १० धावांवर माघारी फिरला, पण या दोन विकेट्स गमावल्यावर शंभर टक्के फिट नसलेल्या विराट कोहलीने ३४ चेंडूत ४९ धावांची खेळी करत लखनऊच्या गोलंदाजांचे खांदे पाडले. कर्णधार रजत पाटीदारने १३ चेंडूत २७ धावांची धमाकेदार खेळी करत संघाला विजयाच्या जवळ नेले. जितेश शर्मा नऊ चेंडूत २३ धावांची खेळी करुन परतल्यावर टीम डेविड १४ (८) आणि रोमारियो शेफर्ड १४ (८) या दोघांनी १६व्या षटकातील पहिल्याच चेंडूवर आरसीबीचा विजय निश्चित केला.

# राज्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगड उपविजेता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सांगली येथील ऑफिसर्स क्लब, आमराई या ठिकाणी महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन मुंबई आणि सांगली जिल्हा असोसिएशनच्या वतीने राज्य सबज्युनिअर, ज्युनिअर आणि गतिमंद (मुले/मुली) यांची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंनी तीन सुवर्ण, चार रौप्य आणि एक कांस्य अशी एकूण आठ पदके विविध गटात जिंकली तसेच सब ज्युनिअर (पुरुष) गटाचे संघिक उपविजेतेपद प्राप्त केले आहे.

रायगड संघाने हे उपविजेतेपद व्यवस्थापक संदीप पाटकर यांनी राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग खेळाडू राजेश अंगद, एकलव्य व्यावसायिक प्रशिक्षण केंद्राचे शिक्षक अमोल काईनकर, जितेश आणि यश यांच्या उपस्थितीत स्वीकारले. यावेळी स्पेशल मुलांच्या स्पर्धेत पेण येथील हनुमान व्यायामशाळेच्या जितेश साजेकर याने सुवर्णपदक आणि यश पंगतने रौप्यपदक मिळविले. त्यांना हनुमान व्यायामशाळेचे संचालक राजेश अंगद यांचे प्रशिक्षण आणि अमोल काईनकर यांचे मार्गदर्शन लाभले. यापूर्वीसुद्धा त्यांनी राष्ट्रीय स्तरावर पदक जिंकले आहे.

या सर्व पदक विजेत्या खेळाडूंचे पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश शरद वेदक, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, सहसचिव सचिन भालेराव,



खजिनदार राहुल गजरमल, ज्येष्ठ खेळाडू व सदस्य माधव पंडित, कार्यकारिणी सदस्य सुभाष टेंबे, संदीप पाटकर, मानस कुंटे, असोसिएशन सहायक रामचंद्र गावडे यांनी अभिनंदन केले आणि राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

**पदकविजेते खेळाडू**

सुवर्ण : अद्वैत भोसले (कॉडझिला जिम महाड), अथर्व लोधी (संसारे फिटनेस पेण), जितेश साजेकर (हनुमान व्यायामशाळा पेण); रौप्य : पार्थ देशपांडे (कॉडझिला जिम महाड), रौनक रोशन जितेकर (चेतन जिम दापोली–पारगाव, पनवेल), साहिल पोरवाल (खोपोली), यश पंगत (हनुमान व्यायामशाळा पेण); कांस्य : श्रेया मांढरे (संसारे फिटनेस पेण).

### रोह्यात नाईट क्रिकेट स्पर्धा

# जि.प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते उद्घाटन



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील संभे येथे श्री. प्रमोद अनंत म्हसकर सामाजिक प्रतिष्ठान पुरस्कृत मैत्री चषक व रोहा तालुका असोसिएशन चषक भव्य नाईट स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी रोहा पंचायत समिती सदस्य सुरेश मगर, उद्योजक व आयोजक प्रमोद म्हसकर, राकेश गायकवाड, सुरेश महाबळे, महेंद्र पोटफोडे, राजेश सानप, अनंत थिटे, सचिन कदम, दर्शन तेलंगे, दिनेश पाशिलकर, संजय राजीवले, मंगेश सरफळे, समिर महाबळे, मनोज शिर्के, निमेश वाघमारे, रवी चाळके, उत्तम नाईक, राजेश कदम आदी उपस्थित होते.

प्रथमच रोहा तालुक्यात भव्य स्वरूपात प्रकाशझोतातील क्रिकेट स्पर्धा होत असल्याने खेळाडू व क्रिकेटप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले. या स्पर्धेस सर्वपक्षीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, खेळाडू व क्रीडाप्रेमी हजर होते.

# जेबीएसपी संस्थेंतर्गत शिक्षकांची रस्सीखेच स्पर्धा रंगली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक (जेबीएसपी) संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त संस्थेंतर्गत शिक्षकांच्या रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पुरुष शिक्षकांमध्ये रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेज खारघर, तर महिला शिक्षकांमध्ये श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालय द्रोणागिरी नोड उरण या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला.



स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे सदस्य राहुल घरत यांच्या हस्ते झाले. त्यांच्याच हस्ते क्रीडा ध्वज फडकविण्यात आला. प्रास्ताविकात प्राचार्य प्रशांत मोरे यांनी स्पर्धेच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट करून सर्व सहभागी संघांना शुभेच्छा दिल्या. स्पर्धेसाठी संकुलातील मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, कैलास म्हात्रे, स्वाती पाटील आदी विभाग प्रमुख तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या स्पर्धेत संस्थेतील आठ शाखांमधून पुरुष शिक्षकांचे सहा, तर महिला शिक्षकांचे सात अशा एकूण १३ संघांनी सहभाग घेतला. पुरुष शिक्षकांमध्ये रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेज खारघर संघाने प्रथम (रोख रक्कम रु. पाच हजार), सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालय नवीन पनवेल संघाने द्वितीय (रोख रक्कम रुपये तीन हजार) आणि सीकेटी आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स सीनिअर कॉलेज खांदा कॉलनी संघाने तृतीय क्रमांक (रोख रक्कम रु.दोन हजार) पटकावला.

महिला शिक्षकांमध्ये श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालय द्रोणागिरी नोड उरण संघाने प्रथम क्रमांक (रोख रक्कम रु. पाच हजार), मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि टी.एन. घरत ज्युनिअर कॉलेज गव्हाण संघाने द्वितीय (रोख रक्कम रुपये तीन हजार) आणि सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालय नवीन पनवेल संघाने तृतीय क्रमांक (रोख रक्कम रु.दोन हजार) पटकावला. संस्थेचे सदस्य राहुल घरत यांच्या हस्ते विजेत्या संघाचा रोख रक्कम, आकर्षक ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन गौरव करण्यात आला तसेच सहभागी सर्व स्पर्धकांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

ज्येष्ठ क्रीडाशिक्षक अरुण पाटील तसेच मनोज पाटील, माधवी कोळी, रामहरी मस्के, मनोहर महाजन, तृप्ती जोशी, दीप्ती वालम, अमृता देशमुख यांनी स्पर्धेचे यशस्वी नियोजन केले. विज्ञान विभाग सहशिक्षिका अपर्णा मुकणे व वाणिज्य विभाग सहशिक्षिका योगिता जोरी यांनी सूत्रसंचालन केले. विज्ञान विभाग सहशिक्षिका तृप्ती जोशी यांनी स्पर्धेचे व्हिडीओ चित्रण केले. सर्वांच्या सहकार्याने स्पर्धा यशस्वी झाली.

# सीएसकेला धक्का! खलील अहमद आयपीएलमधून बाहेर



**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्ससाठी (सीएसके) यंदाच्या आयपीएल हंगामात सर्व पाच सामने खेळलेला संघाचा प्रमुख वेगवान गोलंदाज खलील अहमद आता उर्वरित सामन्यांमध्ये खेळणार नाही. १४ एप्रिल रोजी कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध (केकेआर) झालेल्या सामन्यादरम्यान त्याच्या उजव्या खुब्यामध्ये वेदना जाणवू लागल्या होत्या. आता या दुखापतीमधून सावरण्यासाठी काही आठवड्यांचा कालावधी लागणार आहे.

स्पर्धेच्या सुरुवातीच्या टप्प्यात खलीलने सातत्यपूर्ण कामगिरी केली होती. आयपीएलच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, "ही 'ग्रेड २' स्तराची दुखापत असून यातून सावरण्यासाठी किमान १० ते १२ आठवड्यांचा कालावधी लागेल.

दरम्यान, सीएसकेचा पुढील सामना १८ एप्रिल रोजी सनरायझर्स हैदराबादशी होणार आहे. त्यामुळे खलील अहमदच्या जागी कोणत्या खेळाडूला संघात स्थान मिळते हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

### राज्यस्तरीय पुरुष व महिला गट कबड्डी स्पर्धा

# होतकरू, मिडलाईन, जय भवानी, बालगोपाळ, स्नेहविकास, ओम् वर्तकनगर, नवशक्ती संघांची आगेकूच

**ठाणे : प्रतिनिधी**

होतकरू, मिडलाईन, जय भवानी, बालगोपाळ यांनी पुरुषांत, तर स्नेहविकास, ओम् वर्तकनगर, नवशक्ती यांनी महिलांमध्ये श्री मावळी मंडळाने आयोजित केलेल्या ७३व्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत आपली आगेकूच सुरू ठेवली. पुरुष गटात डॉन बास्कोचा जीत सिंग, तर महिला गटात एसआयईएसची आस्था सिंग दिवसातील उत्कृष्ट खेळाडू ठरले.

ठाणे चरई येथील श्री मावळी मंडळाच्या भव्य पटांगणावर सुरू असलेल्या स्पर्धेत दुसऱ्या दिवशी पुरुष गटात ठाण्याच्या होतकरू मंडळाने उपनगरच्या केदारनाथ मंडळावर २८–१९ अशी मात केली. पूर्वार्धात ९–१० अशा पिछाडीवर पडलेल्या होतकरूने उत्तरार्धात आपला खेळ गतिमान केला आणि लोण देत सामना आपल्या बाजूने झुकविला. मितेश चव्हाण याच्या चढाया आणि तुषार यादव, देवेन पाटील यांचा भक्कम बचाव याला याचे श्रेय जाते. केदारनाथच्या ओमकार कदम, ओम् कदम यांचा खेळ उत्तरार्धात कमी पडला. रायगडच्या मिडलाईन स्पोर्ट्सने अभिषेक भोईर, धीरज बैलमारे, अजित चव्हाण यांच्या चतुरस्त्र खेळाने अष्टविनायक संघाने ३१–२३ असे नमविले. अष्टविनायकचे स्वयंम गोंधळे, सागर भोईर चमकले.

जय भवानी तरुण मंडळाने चिंतामणी स्पोर्ट्सला ३४–२५ असे पराभूत केले ते तुळशीदास शिर्के, कुणाल शिंदे, ऋषिकेश पवार यांच्या चढाई पकडीच्या खेळामुळे. विश्रांतीला १५–१० अशी विजयी संघाकडे आघाडी होती.



चिंतामणीचे हर्षल शहा, विशाल सणस उत्तम खेळले. बालगोपाळ मित्र मंडळाने ओवळी मंडळावर ३४–३१ असा विजय मिळविला. पहिल्या डावात चुरशीची लढत झाल्यामुळे मध्यंतरला गुणफलक १४–१४ अशा बरोबरीत होता. मध्यंतरानंतर बाळ गोपाळच्या फाजल नाडर, राज चौधरी, अतिश जीत यांनी आपला खेळ उंचावत संघाला निसटता विजय मिळवून दिला. ओवळीच्या महेश कदम, प्रिन्स यादव, चिराग सिंग यांचा खेळ मध्यंतरानंतर थोडा कमी पडला.

महिलांमध्ये उपनगरच्या स्नेहविकास मंडळाने ठाण्याच्या अश्वमेघ स्पोर्ट्सला २६–२५ असे चकविले. विश्रांतीला लोण देत १४–०९ अशी आघाडी घेणाऱ्या स्नेहविकासला नंतर मात्र अस्वमेघ संघाने कडवी लढत दिली. प्राची तावडे, रिया तावडे, प्रांजल जाधव स्नेहविकासकडून, तर वैष्णवी चव्हाण अश्वमेघ संघाकडून उत्कृष्ट खेळले.

ओम् वर्तकनगर संघाने वैष्णवी साळुंखे, पूजा जाधव, पूर्वा इंगवले यांच्या तुफानी खेळाने उपनगरच्या सत्यम सेवा संघाला ३८–०८ असे नमविले. मुंबई शहरच्या अमरहिंदने ठाण्याच्या छत्रपती शिवाजी मंडळावर ६०–३८ असा सहज विजय संपदान केला. छत्रपतीच्या तारा देसाई, रेखा गुप्ता चमकल्या.

# आर. वैशालीचा ऐतिहासिक पराक्रम!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय बुद्धिबळपटू आर. वैशाली हिने इतिहास रचत सायप्रसमध्ये झालेली फिडे महिला कॅन्डिडेट्स टूर्नामेंट २०२६ जिंकली. ही स्पर्धा जिंकणारी ती पहिली भारतीय महिला ठरली असून भारतीय बुद्धिबळासाठी हा अभिमानाचा क्षण आहे. या विजयासह वैशालीने सुमारे २५ लाख रुपयांचे पारितोषिकही जिंकले आहे.



**कॅन्डिडेट्स स्पर्धा जिंकणारी पहिली भारतीय महिला**

वैशीलाचा हा पराक्रम भारतीय बुद्धिबळासाठी नवा मैलाचा दगड ठरत आहे. या शानदार कामगिरीमुळे वैशालीला आता महिला विश्वचॅम्पियनशिपमध्ये चीनच्या विद्यमान विजेत्या जू वेनजुनविरुद्ध खेळण्याची संधी मिळणार आहे. हा सामना वर्षाच्या अखेरीस होईल.

# व्यावसायिक पुरुष गट कबड्डी स्पर्धेत चुरस

**मुंबई : प्रतिनिधी**

युवा पलटन, मुंबई पोस्टल, भारत पेट्रोलियम, सीजीएसटी मुंबई बंदर, डीपीयु पुणे, मिड लाईन, मध्य रेल्वे, एचएएल नाशिक, मीरा भाईंदर महानगरपालिका, युनियन बँक, ठाणे महानगरपालिका यांनी ओम् ज्ञानदीप मंडळाने आयोजित केलेल्या या हंगामातील पहिल्या पुरुष व्यावसायिक गट कबड्डी स्पर्धेची बाद फेरी गाठली. मुंबई आदर्श नगर येथील वरळी स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावरील मॅटवर स्पर्धा खेळली जात आहे.



फ गटातील साखळी सामन्यात रायगडच्या मिडलाईन अकादमीने बलाढ्य अशा मध्य रेल्वे संघावर ४९–२० अशी सहज मात केली. झंझावाती सुरुवात करणाऱ्या मिडलाईनने पूर्वार्धातच तीन लोण देत ३५–१२ अशी मोठी आघाडी घेतली. उत्तरार्धात आणखी एक लोण देत या मोठ्या विजयावर शिक्कामोर्तब केले. धीरज बैलमारेच्या तुफानी चढाया त्याला आदर्श कुमारची मिळालेली पकडीची साथ यामुळे त्यांनी २९ गुणांच्या मोठ्या फरकाने विजय मिळविला. रेल्वेच्या शुभम शिंदे, आशिष कुमारचा खेळ या सामन्यात बहारला नाही, पण गट उपविजेते म्हणून रेल्वेनेदेखील बाद फेरी गाठली.

मीरा भाईंदर महापालिकेने प. डावातील १५–१९ अशा पिछाडीवरून जे.जे. रुग्णालयाचा प्रतिकार ४१–३० असा मोडून काढत बाद फेरी गाठली. दोन पराभवामुळे जे.जे.ला साखळीत गारद व्हावे लागले. जे.जे.च्या रिहान शेख, ओमकार दारकुडे यांनी संघाला आधाडी दिली होती. नंतर मात्र ते ढेपाळले. त्यांनी प. डावात तीन, तर नंतर एक अव्वल पकड करीत संघाच्या आशा पल्लवीत केल्या होत्या. दुसऱ्या डावात मीरा भाईंदरच्या संकेत खाताते, संदीप गुरव टॉप गिअर टाकत संघाला बाद फेरी गाठून दिली.

युनियन बँकेने फ गटात प्रथम हिंदुजा रुग्णालयाला ४५–२६ असे पराभूत करीत बाद फेरीच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. नंतर ठाणे महापालिकेबरोबर १४–१४ असा बरोबरीत सामना सोडवित बाद फेरी गाठली. अतुल जाधव, अक्षय तावडे यांच्या चतुरस्त्र खेळाला याचे श्रेय जाते. क गटात मुंबई बंदरने आणि पुण्याच्या डीपीयु संघात ३८–३८ अशी बरोबरी झाली. मध्यंतरलादेखील १७–१७ अशी बरोबरी होती. तेजस टक्के, सौरभ राऊत मुंबई बंदरकडून, तर विकास जाधव, सुमित घोलप डीपीयुकडून उत्कृष्ट खेळले. भारत पेट्रोलियमने ब गटात सीजीएसटीला ४४–४० असे चीत करीत गटविजेते म्हणून बाद फेरी गाठली. सीजीएसटी या गटात उपविजेते ठरले. पूर्वार्धात एका गुणाने पिछाडीवर पडलेल्या भारत पेट्रोलियमने ही किमया केली. योगेश दहीया, राजकमल कुमार यांच्या चतुरस्त्र खेळाला याचे श्रेय जाते. सीजीएसटीच्या शंकर गदई, आशिष बदाडे यांचा खेळ संघाला विजयी करण्यात कमी पडला. युवा पलटनने अ गटात मुंबई पोस्टलला ३२–३१ असे चकवत गटविजेतेपद मिळविले. मुंबई पोस्टल उपविजेते ठरले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com